|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ३२ सोमवार दि. ३१ जुलै २०२३ ते रविवार दि. ०६ ऑगस्ट २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## बाईच्या नादाने जीवनाची वाट चुकला रिक्षावाला सच्चाभाई जीवाला मुकला

कुपवाड/क्राईम रिपोर्टर





दारू पेक्षा बाईचे व्यसन खूप वाईट असते. बाईच्या प्रेमपाशात एकदा का माणूस अडकला कि त्यात तो गुरफटून जातो. अशावेळी त्याला समाजाची नातेवाईकांची कुणाचीही परवा नसते. सांगलीतील सच्चा भाई हा पूर्वी रिक्षा चालवायचा नंतर तो भाईगिरी करू लागला. त्याच्या हातून माजी नगरसेवकाचा खून झाल्यामुळे तर त्याचा आणखी दबदबा वाढला. लोकही त्याला घाबरू लागले. ...पान २ वर

## अनाथ आश्रमातल्या केअर टेकरच्या पापाला वाचा फुटली वासनेच्या भरात त्या नराधमाने पाच बालिकांची अब्रु लुटली

जळगाव/क्राईम रिपोर्टर



सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि वैचारिक दृष्ट्या प्रगत असलेल्या शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात आज महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढलेल्या आहेत. खास करून ग्रामीण भागातील आश्रमशाळा, अनाथ आश्रम आणि तिथे होणारे अल्पवयीन मुला-मुलींचे लैंगिक शोषण हा खरोखरच चिंतेचा विषय बनला आहे. विद्येची मंदिरे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाळांमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीचे शिक्षकांकडूनच होणारे लैंगिक शोषण हा सगळा प्रकार संतापजनक आणि चीड आणणारा आहे. पण अशा घटना रोखण्यासाठी आपल्याकडे सक्षम कायदाही नाही आणि जो कायदा अस्तित्वात आहे त्याची व्यवस्थित अंमलबजावणी होत नसल्याने आरोपी निर्धास्त आहेत. बलात्काराच्या एका प्रकरणातून जामिनावर सुटका होताच दुसऱ्या मुलीची इज्ज़त लुटताना त्यांना कायद्याचीही भीती वाटत नाही आणि पोलिसांचाही धाक उरलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील आश्रम शाळांमध्ये लैंगिक शोषणाच्या अनेक घटना उघडकीस येवूनही आरोपींवर कठोर कारवाई न झाल्याने अशा घटना पुन्हा पुन्हा घडत आहेत. परिणामी ग्रामीण भागातील आश्रम शाळांमध्ये शिकणाऱ्या गरीब मुला-मुलींमध्ये तसेच त्यांच्या पालकांमध्येही भीतीचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील गरीब शेतकरी असो व कष्टकरी आपल्या मुला-मुलींना चांगले शिक्षण मिळावे आणि त्यांचे भविष्य घडावे यासाठी आपल्या मुला-मुलींना आश्रम शाळांमध्ये शिकायला ठेवतात. कारण आश्रमशाळा या सुरक्षित असतात. त्यामुळे आपल्या मुलांच्या शैक्षणिक भवितव्याला कोणताही धोका नाही अशी त्यांची धारणा असते. पण आश्रम शाळांमध्ये मुलींचे होत असलेले लैंगिक शोषण पाहून ग्रामीण भागांमधील पालकांमध्ये असुरक्षिततेची आणि संतापाची भावना आहे. लोक आपल्या मुलांना आश्रम शाळांमध्ये पाठवायला तयार नाहीत आणि त्याला कारणही तसेच आहे. एरंडोल तालुक्यातील खडके बुद्रुक येथील बाल वसतिगृहात ९ त १२ वयोगटातील काही मुलींचे तिथल्याच केअर टेकरने लैंगिक शोषण केल्याचे उघडकीस आले आहे आणि तिथल्या अधिक्षका या केअर टेकरच्या पत्नी असल्याने त्यांनी आपल्या पतीच्या पापावर पांघरून घातले होते. पण हे प्रकरण उघडकीस येताच या पती पत्नीसह तिघांना अटक करण्यात आली आहे.



मुख्य आरोपी गणेश



आरोपी अरुणा



आरोपी पाटील

जळगाव जिल्ह्याच्या एरंडोल तालुक्यातील खडके बुद्रुक येथे अनाथ मुलांचे एक बाल वसतिगृह आहे. या बाल वसतिगृहात अनाथ मुला-मुलींचे संगोपन केले जाते. तसेच त्यांना शिक्षणही दिले जाते. मात्र येथील ९ ते १२ वयोगटातील ५ अल्पवयीन मुलींवर तिथला केअरटेकर गणेश पंडीत याने लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पिडीत बालिकांनी या बाबतची तक्रार जळगावच्या बाल कल्याण समितीकडे केली आहे. त्यानंतर बाल कल्याण समितीच्या सदस्य वैशाली विसपुते यांनी पिडीत बालिकांनी कथन केलेल्या अत्याचाराची माहिती मोबाईलमध्य शूट करून घेतली. यावेळी बाल कल्याण समितीच्या सदस्य डॉ. विद्या बोरनारे, देवयानी गोविंदवार आदी उपस्थित होत्या. जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी डॉ. वनिता डी. सोनगत यांनी एरंडोल पोलीस ठाण्यास या घटनेची माहिती दिल्यानंतर पोलीस निरीक्षक सतीश गोरडे यांनी पोलीस निरीक्षक शरद बगल यांना चौकशी करण्यास सांगितले. बुधवार दिनांक २७ जुलैचा रात्री चाळीसगाव विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील नंदनवाळकर यांनी घटनास्थळी जाऊन घटनेची माहिती घेतली. या माहितीत सदर बालगृहातील ५ अल्पवयीन मुलींवर ऑगस्ट २०२२ ते जून २०२३ या कालावधीत संस्थेतील काळजीवाहक पदावर असलेले कर्मचारी गणेश पंडित याने अनेकदा अत्याचार केल्याचे निष्पन्न झाले. अत्याचार पिडीत बालिकांनी ...पान २ वर

## लंपटगिरीचा नाद त्याच्या प्राणावर बेतला पत्नीची छेड काढताच पतीने जीव घेतला



जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत आशिष

कुटुंबातील महिला हि त्या कुटुंबाची इज्ज़त असते. त्यामुळे आपल्या बहिणीवर, पत्नीवर किंवा अन्य कुठल्या महिलेकडे कुणी वाईट नजरेने पाहिलेले त्या कुटुंबातील पुरुषाला सहन होत नाही. जळगाव जवळच्या बांभोरी गावात प्रमोद नन्नावरे याच्या पत्नीवर त्याच भागात रहाणाऱ्या आशिष प्रकाश शिरसाळे याची वाईट नजर होती. तो नेहमी तिच्याकडे पाहून अश्लील खाणाखुणा करायचा. तिने हा प्रकार आपल्या पतीला सांगितला. त्याने एक दोन वेळा त्याला समजावले, पण तो काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. अखेर प्रमोदने आशिष शिरसाळे याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.



आरोपी प्रमोद

लग्न झाल्यानंतर तरुणींना पतीचे सौभाग्य प्राप्त होत असते. त्यामुळे विवाहीत महिलांना सौभाग्यवती म्हटले जाते. लग्नापुर्वी आई-वडीलांच्या छत्र छायेखाली राहणाऱ्या तरुणीस लग्नानंतर पतीरुपी कायदेशीर कुंपण लाभते. विवाहितेवर तिच्या पतीचा कायदेशीर हक्क असतो. मात्र एखाद्या देखण्या विवाहितेवर देखील काही टवाळखोरांची नजर असते. असे टवाळखोर तरुण विवाहितेची छेडखानी करतात. अशा टवाळखोरांना धडा शिकवण्यासाठी कायदा हाती घेणे चुकीचे असते. मात्र काही विवाहीत तरुण संतापाच्या भरात कायदा हाती घेवून कायद्याचा फास आपल्या गळ्यात लावून घेतात. अशीच एक घटना जळगाव शहरापासून जवळच असलेल्या बांभोरी या गावी घडली. जळगाव नजीक धरणगाव तालुक्यातील बांभोरी या गावी प्रमोद भिमराव नन्नवरे हा तरुण रहात होता. प्रमोद रहात असलेल्या घराजवळच आशिष प्रकाश शिरसाळे हा तरुण देखील रहात होता. अवघा २२ -२३ वर्ष वयाच्या आशिष शिरसाळे या तरुणाची नजर प्रमोद नन्नवरे याच्या पत्नीवर पडली. प्रमोद नन्नवरे याच्या पत्नीला बघून आशिषचा जीव जणूकाही कासावीस होत असे. तो तिच्याकडे बघून अश्लिल हातवारे करत असे. तो नेहमी नेहमी प्रमोदच्या पत्नीची ...पान ६ वर

## ठेवलेली बाई दुसऱ्याच्या प्रेमात फसली पैशाच्या लोभापायी जीव गमावून बसली



खटाव (सातारा)/क्राईम रिपोर्टर

कोणताही गुन्हा कधीच लपून राहत नाही. कधी ना कधी त्याला वाचा फुटते आणि आरोपी किती जरी शातीर दिमाग असला तरी तो पकडला जातो. कोरेगाव जवळच्या एकसळं येथे ठेवलेल्या बाईचा खून करून पळालेल्या एका मेंढपाळाला पोलिसांनी २० वर्षांनी अटक केली आहे. जिच्यावर प्रेम केले ती दुसऱ्याला लागू झाली म्हणून आपण तिचा खून केला असे त्याने पोलिसांसमोर कबुल केले आहे.

कोरेगाव जवळील एकसळ येथील लक्ष्मीनगर येथे मालन बबन बुधवाले ही राहयला आहे. मालन दिसायला देखणी आणि सुंदर असली तरी ती चालूच होती. नवऱ्याला सोडून ती एकटीच राहत होती. तिचे नवऱ्याशी पटत नसल्याने तिने जवळपास नवऱ्याला फारकत दिल्यातच जमा होते. तिने नवऱ्याला ...पान २ वर

## लेकीला त्रास होताच आईने साधला नेम सुपारी देऊन सासूने केला जावयाचा गेम

लातूर/शंकर सोनवणे



मयत हनुमंत

चारित्र्याच्या संशयावरून जेंव्हा पती-पत्नीमध्ये वाद होतात, तेंव्हा दोन्हीकडच्या माणसांनी मिळून हे वाद सामंजस्याने मिटवायचे असतात. पण कधी कधी विवाहितेच्या माहेरची माणसे अशा वादांना हवा देऊन हे वाद मिटवण्याऐवजी टोकाचा निर्णय घेतात. लातूर जिल्ह्यातील एकुर्गा गावातील हनुमंत कटारे याचा त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. त्यातून दोघांची भांडणे व्हायची. मात्र याच वादाला कंटाळून हनुमंताची पत्नी पूजा व तिच्या आईने हनुमंताच सुपारी देऊन काटा काढला. या प्रकरणी हनुमंताची पत्नी पूजा व सासू निर्मला यांच्यासह सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.





आरोपी

गातेगाव पोलीस ठाणे हद्दीतील मौजे ढाकणी ते एकुर्गा शिवारात असलेल्या रेल्वे उड्डाण पुलाखाली हनमंत कटारे नामक व्यक्तीवर धारदार शस्त्राने वार केल्याची माहिती गातेगाव पोलीस ठाण्यात येऊन धडकली. गातेगाव पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार यांनी सदरील घटनेची माहिती घेवून वरिष्ठांना खबर दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून नव्यानेच रुजू झालेले सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानदेव सानप यांनी पोलीस ठाण्याकडे धाव घेत पोलीस ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन पोलीस वाहन ढाकणी गावाच्या दिशेने निघण्याची तजबीज केली. ढाकणी-एकुर्गा रेल्वे उड्डाणपुलाच्या खाली तुरळक लोंकांवी गर्दी होती. पोलीस पोलिसांनी घटनास्थळ गाटून घटनेची प्राथमिक माहिती घेतली. रेल्वे उड्डाण पुलाखाली रक्ताचे शिंतोडे पडलेले ...पान २ वर

## तणावाखाली पोलीस अधिकाऱ्याची मती गुंग झाली पत्नी व पुतण्याला गोळ्या घालून आत्महत्या केली



पुणे/क्राईम रिपोर्टर

कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांवर फार मोठी जबाबदारी असते आणि हि जबाबदार पार पडताना त्यांन कधी कधी त्यांच्या कुटुंबाकडे तसेच खाजगी आयुष्याकडेही लक्ष देता येत नाही. कामाचा व्याप, जबाबदारी, त्यातून आलेला मानसिक तणाव या सगळ्याचा कधी कधी आरोग्यावरही परिणाम होतो. स्वभावात चीडचीडेपणा येतो आणि अशा परिस्थितीतून जाणाऱ्या काही पोलीस कर्मचाऱ्यांनी यापूर्वीही स्वतःचे जीवन स्वतःच संपवले आहे. पुण्यात अशाच एका घटनेत अमरावतीचे सहाय्यक पोलीस आयक्त भारत गायकवाड यांनी रागाच्या भरात पत्नी व पुतण्यावर गोळ्या झाडून स्वतःही आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण पोलीस खाते हादरून गेले असून या प्रकरणी आता चौकशी सुरु आहे.

पुण्यात एक मोठं हत्याकांड समोर आले आहे. पुण्यात एका बड्या पोलीस अधिकाऱ्याने पत्नी आणि पुतण्याची ...पान ६ वर

## संसाराला ग्रहण लावी अनैतिक नात्याचा विकार प्रेयसीच्या पतीची जंगलात प्रियकराने केली शिकार

कर्जत/एस.कुमार



मयत सचिन

अनैतिक संबंधामुळे सुखी संसाराला ग्रहण लागते. अशावेळी दोघांच्या नात्यात जर तिसऱ्याचा अडथला येत असेल तर त्याला मार्गातून हटवणे हाच एक पर्याय असतो. कर्जत जवळच्या देवपाडा येथील एका विवाहितेचे दुसऱ्या तरुणाबरोबर अनैतिक संबंध होते. मात्र या अनैतिक संबंधात तिचा पती अडथला ठरत होता. त्यामुळे दोघांनी मिळून पतीच्या हत्येचा काटा काढण्याचा डाव रचला. त्यानंतर प्रेयसीच्या पतीला प्रियकराने शिकारीला नेले आणि जंगलात त्याची गोळ्या घालून हत्या केली. त्यानंतर हे पाप लपवण्यासाठी प्रेयसीने प्रियकरासोबत पोलीस ठाण्यात जावून पती हरवल्याची फिर्याद नोंदवली. पण पोलिसांच्या चाणाक्ष नजरेतून या दोघांचा गुन्हा सुटला नाही, पोलिसांनी प्रियकराला पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबुल केली. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.



प्रेमात अडथळा ठरणाऱ्या पतीचा प्रियकराच्या मदतीने पत्नीनेच काटा काढल्याची घटना रायगड जिल्ह्यातील नेरळमधील कर्जत तालुक्यातील देवपाडा येथे ही घटना घडली आहे. इतकंच नव्हेतर पत्नीने पोलिसांची दिशाभूल करुन प्रकरणाचा वेगळे वळण लावण्याचा प्रयत्नही आरोपी महिलेने केला होता. मात्र, पोलिसांनी तिचा हा प्रयत्न हाणून पाडत प्रियकरासोबत अटक केली आहे. नेरळमधील कर्जत तालुक्यातील देवपाडा येथे सचिन दत्तू मुरबे (वय ३८) हा रिक्षाचालक राहत होता. त्याचे काही वर्षापूर्वी अरुणा (३८) या तरुणी सोबत लग्न झाले होते. लग्नानंतर दोघांचा ही संसार सुरळीत चालू होता. तसे संसार हा पती व पत्नी दोघांचा असतो. येथे आपण जर आपल्या वैवाहिक ...पान ६ वर

## चारित्र्याच्या संशयामुळे संसाराची माती झाली पत्नीला ठार मारून पतीनेही आत्महत्या केली

धुळे/क्राईम रिपोर्टर

चारित्र्याच्या संशयामुळे माणूस आपले मानसिक स्वास्थ हरवून बसतो. पत्नीच्या चारित्र्यावर जर पतीचा संशय असेल तर संसार उध्वस्त व्हायला वेळ लागत नाही. कारण अनैतिक संबंधाच्या संशयातून घरात रोज पती पत्नीची भांडणे होतात. ही भांडणे पुढे एवढी विकोपाला जातात कि त्यातून एकतर घटस्फोट होतो किंवा मग चिडलेला पत्नी आपल्या पत्नीचा कायमचा काटा काढतो. धुळे जिल्ह्याच्या कुंडाणे-वेल्हाणे गावात अशाच एका घटनेत एका विवाहितेचे तिच्या दिरासोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय तिच्या पतीला होता. याच संशयातून दोघांमध्ये भांडणे व्हायची. अखेर एकेदिवशी पतीने लाकडी दांड्याने पत्नीच्या डोक्यावर प्रहार करीत तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



अनिल बाळू सोनावणे- पाटील, जितेंद्र बाळू सोनावणे-पाटील आणि जयेश बाळू सोनावणे- पाटील हे तिघे भाऊ कुंडाणे - वेल्हाणे गावात विभक्त कुटुंब पद्धतीने रहातात. यापैकी मोठा भाऊ अनिल हा मुंबई येथे रेल्वे विभागात नोकरी करतो. जितेंद्र आणि जयेश हे दोघे जण गावातच शेतीचा व्यवसाय करतात. गावात चांगुलपणाने आदर मिळवलेले हे तीन भाऊ गावातील सर्वाशीच मिळून-मिसळून वागत असल्याने सर्वाशी त्यांचे सलोख्याचे व आपुलकीचे संबंध आहेत. या तीनही भावांचे विवाह झाले असून त्यांना अपत्येही आहेत. तिघांचाही संसार सुखाचा सुरू असतांनाच काही दिवसांपूर्वी जितेंद्र सोनावणे-पाटील याच्या संसाराला कुणाची तरी नजर लागली. जितेंद्र हा त्याची पत्नी प्रतिक्षा उर्फ टीना हिच्याशी आपुलकीने व प्रेमाने वागत होता. या दाम्पत्याला एक ६ वर्षाची मुलगी आणि ३ वर्षाचा मुलगा आहे. हम दो हमारे क्ष असा हा सुखी परिवार असून सारे सुरळीत सुरू होते, पण अचानक या सुखी संसारात संशयाचा कली शिरला आणि होत्याचे नव्हते झाले. प्रेमाने बायकोशी संवाद साधणारा जितेंद्र आता तिच्याशी तुसडेपणाने बोलू लागला. झोपतांना दिवसभराच्या घडामोडी तिला सांगणारा, तिच्याशी प्रेमाने वागणारा जितेंद्र आता बायकोकडे पाठ करून झोपू लागला. आपल्या नवऱ्याच्या ...पान ६ वर

31 JULY TO 06 AUGUST 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 7/29/2023 9:22 PM Page 1



## पान १ वरून...

### अनाथ आश्रमातल्या केअर टेकरच्या ...

त्यांच्यावर होत असलेल्या अत्याचाराची माहिती वस्तीगृहाचे अधीक्षक आणि सचिवांना दिली असताना त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. याबाबत उपनिरीक्षक शरद बगल यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गणेश पंडित अधीक्षिका अरुणा पंडित आणि सचिव भिवाजी पाटील यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. खडके बुद्रुक अनाथ मुलांच्या बालगृहात १९ विद्यार्थिनी होत्या. संस्थेला शासनाकडून अनुदान मिळत नसल्याने संस्था बंद करण्याबाबत नोव्हेंबर २०२२ पासून सरकारशी पत्रव्यवहार सुरु होता. या पत्र व्यवहारामुळे बालकल्याण समितीच्या सदस्यांनी १९ पैकी ८ बालिकांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले होते. तर उर्वरित ११ बालिकांना जिल्हा परीविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचालित जळगाव येथील मुलींचे बालगृह येथे तात्पुरते ठेवण्यात आले आहे. पिडीत मुलीनी आपल्यावरील अत्याचाराची माहिती बालगृहाच्या अधीक्षिका आणि सचिवांना सांगूनही त्यांनी हि माहित लपवून ठेवली, असे राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांनी विधान परिषदेत सांगितले. त्यामुळे मोठी खळबळ माजली. दरम्यान या घटनेला मंत्री गिरीश महाजन यांनी दुजोरा दिला असून या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आल्याचे सांगितले. तसेच याबाबत गृहमंत्री सभागृहात निवेदन करतील अशीही माहिती दिली.

### बाईच्या नादाने जीवनाची वाट ...

याच दरम्यान तो एका बाईच्या प्रेमात पडला आणि तिच्या प्रेमात इतका गुरफटला की दिवस-रात्र तिच्या घरी पडून राहू लागला. हा प्रकार तिच्या नातेवाईकांना आवडत नव्हता. पण सच्चाभाईच्या दहशतीपुढे कुणाचे काही चालत नव्हते, पण एकेदिवशी तिच्या चुलत भावाने बेसावध असलेल्या सच्चावर कोयत्याचे वार करून त्याची हत्या केली आणि स्वतःच पोलिसांसमोर हजर झाला. सांगली शहर आणि परिसरात एका मागून एक मागून पोलीस रेकॉर्ड वरील नामचीन गुंडाचा दिवसाढवळ्या खून होताना दिसून येत आहे. टारझन उर्फ सचिन जाधव हा सांगली शहर परिसरातील नामचीन गुंड म्हणून ओळखला जातो. त्याचेवर सांगली शहर पोलीसात आणि कराड शहर पोलीसात खून, मारामारी, धमकी देण, खंडणी गोळा करणे असे विविध गुन्हे दाखल आहेत. सुरूवातील त्याच्या घरची परिस्थीती ही तशी बेताचीच होती. त्याचे वडिल हे सांगली शहरात रिक्षा चालवत होते. पुढे मग सचिन हा त्याची रिक्षा चालवू लागला. त्याने आपल्या रिक्षाच्या मागे टारझन असे लिहून घेतले. तेव्हापासून तो टारझन नावानेच ओळखला जातो. तो रिक्षा चालवित असतानाच गुंडगिरीकडे वळाला. त्यातूनच त्याने काही वर्ष रिक्षा संघटनेत काम केले. हे काम करीत असताना तो शहरातील नामचीन गुंडाच्या संपर्कात आला. आणि इथूनच त्याची गुन्हेगारी क्षेत्रातला दबदबा वाढला. सन २ डिसेंबर २०११ रोजी राममंदिर ते शासकीय रुग्णालय रस्त्यावर माजी नगरसेवक दाद्दा सांवत याचेवर गोळीबार करून त्याची हत्या करण्यात आली. या खूनाच्या घटनेचा सच्चा हाच मुख्यसुत्रधार होता.खरे तर या घटनेनंतर सच्चा जाधव चर्चेत आला.या खूनप्रकरणी सच्चा जाधवसह सात जणांवर त्यावेळी सांगली शहर पोलीसांनी गुन्हा दाखल केला. आपल्या भावाच्या खूनाचा बदला घेणेसाठी मयत दाद्दा सावंत याचा भाऊ सचिन सावंत याने सच्चा जाधव वर दोन ते तीन वेळा प्राण घातक हल्ला केला. पण त्यातून सच्चा जाधव हा सहिसलामत वाचला. तेव्हापासून आपली गेम होण्याआधीच सच्चा जाधव हा सतर्क झाला. दरम्यानच्या काळात ८ मे २०१८ रोजी तत्कालीन पोलीस अधिक्षक सुहैल शर्मा यांनी कोल्हापूर आणि सांगली जिल्हयातून त्याची एक वर्षासाठी हद्दपार केली. गुंड अकबर अतारचा खून ८ डिसेंबर २००८ साली झाला. त्यावेळी अकबरची बहिण झरीना अतार हिने या घटनेची फिर्याद सांगली शहर पोलीसात दाखल केली.अकबरच्या खूनात दाद्दा सांवत याचा हात असल्याची माहिती सचिन जाधव याने अकबरच्या बहिणीला देवून त्याचे नाव त्याने या खूनप्रकरणात गोवले होते. झरीना हिने दाद्दा सावंत याचे नाव यात घेतल्याने दाद्दा आणि सचिन जाधव याचेत वितुष्ट निर्माण झाल्यावर सचिन जाधव याने दाद्दावर गोळया घालून त्याचा खून केला. आपल्यावर दाद्दा सावंत याच्या टोळीकडून कधी गेम होईल ही भिती सचिन जाधव याला होती.म्हणून तो सांगली शहरात फिरत ही नव्हता. मागे एकदा मिरज मालगाव राडवर दाद्दा सांवत याच्या टोळीकडून सचिन जाधव याचेवर सुभाष नगर येथे हल्ला करण्यात आला त्या हल्ल्यातून ही सचिन जाधव हा वाचला. यावेळी त्याच्या पायाला गोळी लागली होती. ती गोळी सचिन याने मिरजेतील एका सर्जनकडून काढून घेतली. या घटनेची नोंद त्यावेळी पोलीस ठाण्यात झाली नव्हती. मध्यतंरी तो गावठी पिस्तुल ही विकत होता. या बेकायदा गावठी पिस्तुल विक्री प्रकरणी कराड पोलीसांनी त्याचेवर कारवाई केली होती. त्यानंतर ही सांगली शहर पोलीसांना सच्चा जाधव आणि त्याचे साथीदाराकडून तीन गावठी पिस्तुल दोन रिव्हालवर जप्त केले. त्याचेवर बेकायदा हत्यार वापरणे,धमकी देणे,खुन करणे,दशहत माजविणे आदी गुन्हे पोलीस स्टेशनमध्ये आहेत. चार वर्षापूर्वी त्याने दलित महासंघाच्या राजकीय परिषदेचे आयोजन करून त्याची जिल्हा अध्यपदी निवड ही करण्यात आली.राजकारणातून तो परत गुन्हेगारी कडे वळाला होता. गेल्या वर्ष दीड वर्षाभरापूर्वी तो दाद्दा सावंत याच्या खूनाच्या केसमधून जामीनावर बाहेर आला होता. हल्ली त्याने ४५ शी ओलांडली असली तरी त्याने सांगलीतील अहिल्यानगर भागात एक बाई ठेवून घेतली असल्याने त्या बाईच्या नादाने तो तिच्याकडे सारखा येत जात होता. त्या दोघांचे ते संबंध त्या बाईच्या घरच्या लोकांना समजले होते. ती बाई ही त्याच्या प्रेमसंबंधात इतकी अडकत गेली की त्याचा नाद सोडू इच्छित नव्हती. ती आपल्या घरच्या लोकांचा सगळ्याचा विरोध झुगारून त्याला आपल्या घरात थांबवून घेत होती. हल्ली टारझन उर्फ सच्चा जाधव हा सारखा त्या बाईच्या घरातच पडून राहत होता. तेथेच दारू पिणे, खाणे झोपणे असे त्याचे झाले होते. तो सराईत गुंड असल्याने त्याला कोणाची कसलीच भिती नव्हती. त्या बाईच्या घराच्या लोकांनी त्याला किती तरी वेळा तू येथे राहू नकोस तुझ्यामुळे आमची बदनामी होत आहे, असे सांगितले होते. अशावेळी तो उलट त्यानाच धमकी देवून गप्प बसवत होता. त्याची ही धमकी त्या महिलेच्या घरातील नातेवाईक गणेश मोरे नावाच्या तरूणाला खपत नव्हता. ती बाई गणेशची नात्याने चुलत बहिण होती.त्याचे कुटूंब कर्नाटकातून रोजी रोटीसाठी बऱ्याच वर्षापूर्वी येथे आले. त्याच्या बहिणीने तिच्या नवऱ्याला सोडून दिल्याने ती सच्चाला चिकटली होती. तो तिला सगळे काही देत होता म्हणून ती ही त्याच्यावर आपली जवानी उधळत होती नेमकी ही गोष्ट गणेश मोरे याला पटत नव्हती. सच्चाने घरात येणे त्याला रुचत नव्हते. तो सच्चा जाधव याला घाबरत नव्हता.तू गावाचा टारझन असशील तर मी ही वाघ आहे असे तो त्याला म्हणत होता. सच्चा हा त्या महिलेच्या घरात त्याला दिसला की त्याच्या हातापायचा राग त्याचे डोक्यात जात होता. बऱ्याचवेळेला गणेश याने सचिन जाधव याला समजावून सांगून पाहिले होते. भांडणात त्याचेबरोबर दोन हात ही केले होते. पण ज्या ज्यावेळी तो सच्चाला समजावून सांगत होता. त्याला मारायला जात होता त्या त्या वेळी ती महिला त्याला अडवत होती. ती महिला ही सांगून ऐकत नाही आणि सच्चा ही सांगून ऐकत नाही म्हणून गणेशने एक वेगळाच विचार केला. कारण सच्चा जाधव आणि जुलत बहिणीच्या अशा वागण्यामुळे गणेश मोरे याची भागात इज्जत अब्रु जात होती. त्यामुळे सच्चा जाधव याचा कायमचा काटा काढयाचा याचा त्याने विचार केला. त्याला कसे मारायचे याचा ही त्याने प्लॅन केला. हल्ली तर सच्चा हा रात्र आणि दिवस त्या महिलेच्या घरातच झोपत होता. त्या दोघांचे ते अनैतिक अश्लील चाळे बघून गणेश मोरे याला संताप येत होता. एकदा दोनदा त्याने त्या दोघांना तसले चाळे करताना रंगेहात पकडले होते. त्या दोघांना तसल्या अवस्थेत बघून त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली होती.आता सच्चा जाधवला संपविले नाही तर पाणी डोक्यावरून जाणार हे त्याने ओळखले. नेहमी प्रमाणे रविवार दि.२३ जुलै रोजी सच्चा जाधव हा त्या महिलेच्या घरात झोपला होता. दिवसभर रात्र भर दारू पिऊन त्याने तिच्याबरोबर कामसुख ही घेतले.त्यामुळे रात्री तो उशिराच झोपला. ही गोष्ट गणेश मोरे याला कळाल्यावर तो सोमवार दि.२४ जुलै रोजी सकाळी पाच साडे पाचच्या दरम्यान तडक त्या महिलेच्या घरात शिरला. दरवाजा पहाटे बंद होता.दरवाजा वाजवून त्याने बहिणीला दरवाजा उघडायला भाग पाडले. त्याच्या बहिणीने दरवाजा उघडल्यावर तो घरात शिरला. खाटावर सच्चा जाधव हा अर्धनग्न अवस्थेत गाढ पालथा झोपला. खरे तर त्याच्या दारूची नशा अजून उतरली नव्हती. त्याने काय ओळखायचे ते ओळखले होते. तो रागाच्या भरात आल्यावर त्याची बहिण ही आतील खोलीत फ्रेश होण्यासाठी गेली. गणेश हा त्यावेळी आपल्या हातात कोयता घेऊन त्याचेसमोर उभा होता. एकवेळ रागाने झोपलेल्या सचिनकडे बघून त्याने त्याला मनात अर्वाच्च भाषेत शिवी देत आपले दात ओठ खात त्याच्या पाठीवर, मानेवर, हातावर, कमरेवर सपासप असे १४ वार केले. त्यावारासरशी सच्चा हा ओरडत जागा झाला.हे बघून ती महिला आतील खोलीतून बाहेर आली. गणेश मोरे याच्या हातातील रक्ताने माखलेला कोयता बघून ती मोठ्याने ओरडत बाहेर आली.तिच्या ओरडण्याने शेजारचे लोक ही तिच्या घराकडे पळत आले. घरात गणेश मोरे याने सच्चा जाधव याचेवर कोयत्याने वार केल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडला.घटनास्थळी लोकांची गर्दी होताना बघून आपल्या हातातील रक्ताने माखलेला कोयता घेऊन गणेश हा बाहेर पडला तो तडक कुपवाड पोलीस स्टेशनला गेला.त्याच्या हातातील रक्ताने माखलेला कोयता बघून पोलीस ही हादरले. त्याने पोलीसांना घडलेली हकीकत सांगून आपण गुंड सच्चा उर्फ सचिन जाधव याचा खून केल्याचे सांगितले. तोपर्यत त्या महिलेने घटनास्थळावरील लोकांच्या मदतीने सच्चा जाधव याला उपचारासाठी सांगली येथील वसंत दादा शासकीय सामान्य रुग्णायालयात दाखल केले.तेथे त्याचेवर उपचार सुरू असताना सकाळी ९ ते १०च्या दरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती समजताच रुग्णालयाच्या आवारात सच्चा जाधव याच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली. तर घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक प्रणिल गिल्डा यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. घटनेनंतर गणेश मोरे हा स्वत:हून पोलीसात हजर झाल्याने पोलीसांचा त्रास थोडासा वाचला होता. कुपवाड पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.गणेश मोरे याने या घटनेची कबुली पोलीसांना दिल्याने पोलीसांनी या घटनेची लेखी फिर्याद त्या महिलेकडून लिहून घेतली. तिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी टारझन सचिन उर्फ सच्चा पांडुरंग जाधव (वय ४४) याच्या खून प्रकरणी गणेश विनोद मोरे (वय १९) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलिस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. या घटनेचा तपास पो.निरी सतिश शिंदे, कुपवाड पोलिस स्टेशनचे स.पो.नी अविनाश पाटील आणि त्याचे सहकार्यानी केला. बाईच्या नादाला लागलेला माणुस हा तिच्यासाठी वेडा पिसा होत असतो. त्याला तिच्याशिवाय काही सुचत नसते. ती ही त्याचेवर जीव टाकत असली की काही विचारण्याची सोय नसते. त्यातून हे प्रकरण वाढत गेले की अशा घटना घडत असतात.

### ठेवलेली बाई दुसऱ्याच्या प्रेमात फसली...

सोडून दिल्याने तिच्या जवानीची आग विझविणारा तिला कुणी तरी पाहिजे होता. तिची भिरभिरणारी नजर भूषणगड येथे राहणाऱ्या किसन जाधव याने हेरली. तशी त्याची त्यावेळी तिच्याबरोबर तोंड ओळख होती. किसन जाधव हा मेंढपाळ म्हणून काम करीत असल्याने तो मेंढया चरविण्यासाठी तिच्या घराशेजारी असणाऱ्या मोकळया रानात जात येत होता. मेंढया चरायला सोडून तो तिच्याबरोबर गप्पा मारत असताना तो तिच्याशी लगट करीत होता. बिननवऱ्याची बाई तिची काय गरज आहे हे ओळखायला किसन ला जास्त वेळ लागला नाही. ती ही चालू आहे हे लक्षात आल्यावर तो मेंढया चारवायला म्हणून ती राहत असलेल्या ठिकाणच्या मोकळया मैदानात जावू लागला. एव्हाना तिने ही त्याच्या नजरेतील भाव ओळखल्यावर त्या दोघांना ही जवळ यायला वेळ लागला नाही. एकदा ते दोघे गप्पा मारत असताना त्याने तिला जवळ ओढत आपल्या अंगाखाली घेतले.तिची भरगच्च जवानी त्याने आपल्या रांगडया अंगाने सोलून काढली. त्यावेळेपासून ती त्याची दिवानीच झाली. किसन घराकडे आला की तिला त्याच्याबरोबर मजा मारू वाटत होते. तिच त्याला आपल्या अंगावर ओढून घेऊ लागल्यावर किसनला ही आयीतच संधी मिळत होती. ते दोघे ही संधी मिळताच कामवासनेने एकत्र येत होते. त्या दोघात जवळीकता वाढत होती. तो ही आपल्या बायका मुलांना सोडून तिच्याबरोबरच राहू लागला. ती म्हणेल तसे ऐकू लागला. त्याने तिला ठेवूनच घेतले होते. ती त्याची रखेल बनली होती. ती ही चालू आणि हुशार असल्याने त्याच्याकडून ती त्याला चमडी देवून दमडी उकळू लागली होती. खऱ्या प्रेमात आणि नात्यात व्यवहार आला की ते प्रेम प्रेम राहत नाही आणि ते नाते ही टिकत नाही तसेच त्याचे ही झाले होते. तो फक्त तिची जवानी उपभोगत होता. तिची पैशाची गरज काही तो पुर्ण करीत नव्हता. तिला छान शौकी राहयची सवय होती. तिच्यावर कुणी पैसा उधळणारा तिला पाहिजे होता. त्यामुळे ती किसनला सोडून दुसऱ्याच्या नादाला लागली होती. आपण ठेवलेली बाई आपल्याला सोडून दुसऱ्याच्या नादाला लागली आहे हे किसनला पटत नव्हते.या कारणातून तो तिच्याबरोबर सारखा भांडण काढत होता. तिला मारहाण करीत होता. एकप्रकारे तो तिच्यावर बायकोचा हक्क गाजवित होता. पण ती त्याला आपल्या अंगाला हात ही लावू देत नव्हती. त्यामुळे तो दारूच्या नशेत येवून तिला जबर मारहाण करीत शिवीगाळ करू लागल्यावर मालनने त्याला आपल्या घरात यायला बंदी घातली. तुझा माझा काही संबंध नाही. तु माझा काही नवरा नाहीस, मी काय तुझी लग्नाची बायको नाही तुझा मार खायला. तु परत माझ्या घराकडे आलास तर मी तुझ्या विरोधात पोलीसात तक्रार करेन अशी धमकी ही दिली. तिने त्याला आपल्या राणीची अशी काही झलक दाखवली होती की तो काही केल्या तिला सोडयला तयार नव्हता. ती मात्र त्याच्या माघारी दुसऱ्या पुरूषाच्या नादाला लागली होती. त्या दोघांची भांडणे शेजाऱ्यांना रोजचीच झाली होती. त्यांनी त्याच्या भांडणात लक्ष देणे कमी केले होते. त्या दोघाच्या भांडणाचा रोजचा तमाश बघून ते ही कंटाळले होते. त्या दोघांचे लफडे गावातील सर्वांना माहित असल्याने कुणी त्याच्या भांडणाकडे लक्ष ही देत नव्हते. तसे ते दोघे ही ४०शी ओलांडली असल्याने त्या दोघांना समजावून तरी कुणी सांगणार होते. वयाच्या ५०शीतील किसन हा तसा रागीट आणि भांडखोर वृत्तीचा होता. दारू पिऊन यायचे आणि काही तरी खुरापत काढून मालनला मारहाण करायचे हे त्याचे नित्याचेच झाले होते. तिने अंगाला हात लावू दिले नाही तर तो पिसाळल्यासारखा करीत होता. २२ फेब्रुवारी २००२ रोजी तो मालनच्या घरात दारू पिऊनच आला.तो दारू पिऊन आल्यावर मालनने त्याच्याकडे पैशाची मागणी केली. त्याने तिला पैसे दयायला नकार दिल्यावर त्या दोघांत भांडण सुरू झाले.तो तिला जवळ ओढून आपली कामवासना भागवू पाहत होता. पण ती त्याला आपल्या अंगाला हात ही लावू देत नव्हती. ती अंगाला हात लावू देईना म्हणून तो तिच्यावर चिडला होता. त्याने तिचे केस धरून तिला मारहाण करायला सुरूवात केल्यावर तिने त्याला बाजुला ढकलून देत त्याला शिव्या देत मी काय तुझी बायको नाही तुझ्याबरोबर फुकट झोपायला असे म्हटले. त्याचा राग किसनला आला. त्याने बाजुलाच पडलेला लाकही दांडका उचलला आणि रागाच्या भरात तिच्या डोक्यात जोराने हाणला. तशी ती ओरडत जमीनीवर पडली. तिचे डोके फुटून रक्ताची धार लागली. काही क्षणातच टाचा घासत तिने आपला जीव सोडला. आपल्या हातून तिचा खून झाला आहे हे किसनच्या लक्षात आल्यावर रात्रीच्या अंधारात त्याने घराचा दरवाजा बंद करून कुणाला काही समजणार नाही अशा बेताने तेथून निघून गेला. दुसऱ्या दिवशी त्याने कोरेगाव सोडले. दुसऱ्या दिवशी मालनच्या घराचा दरवाजा दुपार झाली तरी उघडला नसल्याने शेजाऱ्यांना शंका आली. त्याने घराच्या खिडकीतून आत डोकावून पाहिले असता मालन ही रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे त्यांना दिसले. या घटनेची माहिती त्यांनी कोरेगाव पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला. त्यांना मालन बुधवाले ही ३५ वर्षीय महिला आतील खोलीत रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसले. बाजुलाच रक्ताने माखलेला लाकडी दांडका ही पडला होता. या घटनेची माहिती पोलीसांनी शेजाऱ्याकडून घेतली असता मालन ही किसन जाधव याच्याबरोबर राहत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनसाठी कोरेगाव येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेतील संशयीत आरोपी किसन जाधव हा फरार झाला होता. त्याचा शोध पोलीस घेत होते. पण तो काही पोलीसांना सापडत नव्हता. वर्ष, दोन वर्ष झाली, तरी तो काही पोलीसाच्या हाती लागत नव्हता. पोलीस त्याच्या मागावर होते. या घटनेला आता जवळपास २० वर्ष झाली. पोलीसांनी फाईल बंद केली होती. इकडे घटना घडून बरीच वर्ष झाल्याने किसनला वाटत तो ही आपली वेशभुषा पालटून मुंबई, पुणे, अशा मोठ मोठया शहरात राहत होता. बपण बरीच वर्ष शहरात राहिल्यावर त्याला परत आपल्या गावाकडची ओढ वाढू लागली. गेल्या काही दिवसापूर्वी भूषणगड येथे रहायला आहे. या घटनेचा तपास कोरेगाव पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणेचे पोलीस ही करीत होते. गेल्या २० वर्षापूर्वी घडलेल्या खुनातील संशयीत आरोपी किसन जाधव हा बेशभुषा बदलून भूषणगड येथे राहयला आल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषनाच्या पोलीसांना मिळाली. तो गावात येवून मेंढपाळ व्यवसाय करीत असल्याचे त्यांना समजल्यावर पोलीसांनी त्याच्या मागावर गुप्त खबऱ्यांना लावले. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांची खात्री पटल्यावर भूषणगड येथे तो मेंढया चारत असताना पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याचेकडे २० वर्षापूर्वी घडलेल्या खूनाची माहिती घेतली असता त्याने आपणच मालन बुधवाले हिचा खून केल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. पोलीसासमोर त्याने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर या घटनेत स्वत:ताच फिर्याद होऊन या घटनेची नोद पोलीस स्टेशनला केली. मालन बुधवाले (वय ३५) रा.एकसळ तालुका कोरेगाव या महिलेच्या खून प्रकरणी तिचा प्रियकर किसन नामदेव जाधव (वय ७०) रा.भूषणगड याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा तपास पोलीस अधीक्षक समीर शेख याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी अरूण देवकर व स्थानिक गुन्हे अन्वेषनाच्या पोलीसांनी केला. मेलेली मडी उकरून काढून पोलीस त्याचेकडून गुन्हा कबुल करीत असतात. त्यात गुन्हा करून आपण सहीसलामत सुटलो आहोत असे कोणाला वाटत असेल तर पोलीस एक ना एक दिवस त्याच्या मुसक्या आवळतातच हेच या घटनेवरून दिसून येते.

### लेकीला त्रास होताच आईने साधला...

दिसले. दरम्यान हनुमंत कटारे यांना दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले मात्र उपचारा पूर्वीच हनुमंत कटारे यांचे निधन झाल्याचीं माहिती पोलिसांच्या हाती आली. दरम्यान वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देवून पोलि अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य त्या सुचना देवून तपासाचे आदेश दिले. गातेगांव पोलसांनी दवाखान्याला भेट देऊन पोलिसांनी आवश्यक ती माहीती हास्तगत केली. तसेच हनुमंत कटारे यांचे प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवले. दरम्यान हनमंत कटारे यांचा खून केणी? व का केला आसावा यांचा धागादोरा मिळवण्यासाठी गातेगांव पोलिस ठाण्याचे सपोनि ज्ञानदेव सानप या प्रकरणातील प्रत्येक बारीक गोष्टीचा बारकाईने आभ्यास करत होते. दरम्यान मयत हनमंत कटारे यांची पत्नी पुजा कटारे हिने गातेगांव पोलिसात हजर राहत फि र्याद दिली. तिने फि र्यादित दिनांक १८ जुलै रोजी पूजा आणि तिचा पती हनुमान कटारे हे दोघे दुचाकी वरून शेताकडे निघाले होते. पूजा आणि हनुमंत हे दोघे ढाकणे पाटी येथून उजवीकडे वळून ढाकणे कडे जात असताना रेल्वेचा पुल लागतो. या पुलाखाली कटारे यांची दोघांची दुचाकी आली असता पूजेच्या नंदीचा नवरा श्रीमंत गुटे आणि अनोळखी एक व्यक्ती तिथे आले. आणि त्यांनी तू माझे आणि माझ्या बायकोचे जमिनीचे प्रकरण का मिटू देत नाहीत असे म्हणत हनुमंत कटारे यांच्या डोक्यात कोयत्याने तीन ते चार वार केले. तर श्रीमंत गुट सोबत असलेल्या अनोळखी व्यक्तीने हनुमंत कटारे यांच्या डोक्यावर काठीने वार करून हनमंत कटारे यांना गंभीर जखमी केले असे तक्रारीत नमुद केले. पुजा कटारे हिने दिलेल्या तक्रारीवरून गातेगांव पोलिस ठाण्यात गुरन १०८/ २३ कलम ३०२, ३४१, ५०४, ३४ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल केला. लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, लातूर ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी, सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सुत्र गातेगांव पोलिस ठाण्याचे सपोनि ज्ञानदेव सानप यांच्या हाती देण्यात आले. पूजा कटारे हिनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. पूजा कटारे हिची नणंद जनाबाई तिचा विवाह मौजे एकुर्गा गावातील श्रीमंत घुटे त्यांच्यासोबत झाला होता. मात्र गेल्या पंधरा वर्षांपूर्वी श्रीमंत घुटे यांनी सुनिता नामक महलेशी विवाह केला होता. पासूनच होतो माजलगाव जिल्हा बीड या ठिकाणी आपल्या पतीसोबत राहत होता. जनाबाई सासर सोडून माहेरी जोडजवळा येथे राहत होती अशी प्राथमिक माहिती पोलिसांनी हस्तगत केली. ज्ञान गादेगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव सानप यांनी गातेगाव पोलीस ठाण्याचे एक पथक तयार करून ते पथक जोड जवळा येथे जनाबाई श्रीमंत गोटे यांच्याकडे चौकशीसाठी पाठवले. जनाबाई श्रीमंत गोटे यांची भेट घेऊन पोलिसांनी अधिक माहिती घेतली असता जनाबाई घुटे आणि श्रीमंत घुटे यांच्यात जमिनीचा वाद चालू असून प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याची माहिती समोर आली. बहुतेक श्रीमंत घुटे यांनीच हे हत्याकांड घडवले असावे असा संशय पोलिसांच्या मनात बळवला. त्यावरूनच पोलिसांनी पुढील तपासात सुरुवात केली. बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे रहात असलेल्या श्रीमंत घुटे यांना पोलिसांनी या प्रकरणातील संशयित आरोपी म्हणून चौकशीसाठी ताब्यात घेतले. मात्र श्रीमंत घुटे यांचा या प्रकरणाशी कसलाही संबंध नसल्याची माहिती समोर आली. फिर्यादीने दिलेला जबाब आणि संशयीत आरोपी यांच्या जबाबांमध्ये कुठेतरी विसंगती असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. घरातच कुठेतरी पाणी मुरते असा संशय पोलिसांचा बळावला. श्रीमंत घुटे आणि अन्य एक अनोळखी साथीदार आपल्या पतीला आपल्या डोळ्यादेखत कोयत्याने वार करून खून केल्या केल्याचे पूजा कटरीने तक्रारीत नमूद केले होते. परंतु आरोपींनी पूजाला मात्र धक्काही लावला नव्हता. तसेच पूजाला साधे खरचटले सुद्धा नव्हते ही बाब पोलिसांच्या नजरेतून सुटली नव्हती स्वतःच्या नवऱ्यावर प्राण घातक हल्ला करताना कोणतेही बायको नवऱ्याला वाचविण्यासाठी थोडा थोडाफार विरोध करतच असते परंतु पूजाने असे काहीच केले नव्हते ही बाब पोलिसांच्या नजरेतून सुटत नव्हती त्यामुळे पोलिसांनी उलट तपासणीला सुरुवात केली. दरम्यान जिल्हा पोलिस अधिक्षक सोमय मुंडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले. गातेगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव सानप यांनी या घटनेची पुन्हा प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली.सर्वप्रथम त्यांनी जोड- जवळा येथे हनुमंत कटारे यांची बहीण यांच्याशी संपर्क करून अधिक माहिती जाणून घेतली. पूजा कटारे आणि हनुमंत कटारे रहात असलेल्या ठिकाणी भेट दिली. दरम्यान गेल्या अनेक वर्षापासून पूजा कटारे हिची आई धार्मिक कार्यक्रमात आराधीन म्हणून परडी घेऊन वावरत होती. तर राजेंद्र नितळे आणि दत्तात्रय लोंढे हे जागरण गोंधळा सारख्या धार्मीक कार्यक्रमात गोंधळी म्हणून कार्यक्रम पार पाडत होते. धार्मिक कार्यक्रमानिम्मीत हे तिघेजण एकत्र येत असल्यामुळे यांच्यात चांगलीच ओळख निर्माण झाली होती. लग्नसराईत तर जागरण गोंधळ कार्यक्रमाच्या भरपूर सुपाऱ्या या तिघांना मिळत होत्या, त्यातून बऱ्यापैकी पैसा त्यांच्या हाती येत होता. हे तिघेजण धार्मिक कार्यक्रमात सतत सहभाग नोंदवत असल्यामुळे या तिघां मध्ये जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. त्यातूनच निर्मला दयाळ हिच्या घरी या दोघांचे नेहमीच येणे जाणे होत होते. आराधी आणि गोंधळी असे बिरुद लागलेल्या या तिघांच्या व्यवाहराबद्दल कोणीही तिळमात्र शंका घेत नव्हतं ते नेहमीच घरच्यासारखे राहत होते. दरम्यान पूजा कटारे हिचा नवरा हनुमंत कटारे हा नेहमीच शिल्लक शिल्लक कारणावरून पूजा हिला सतत भांडत होता. काही दिवसांपूर्वी निर्मला दयाळ हीची मुलगी पूजा कटारे ही जोडजवळा सोडून आपल्या तिघा लेकरं माहेरी वास्तव्यास आली होती. दरम्यान हनमंत कटारे देखील मरूड येथील ठोंबरे नगर येथे आपल्या सासरवाडीत राहण्यासाठी आला होता. हनमंत कटारे पूजा हिच्या चारीत्र्यावर सारखा सेशय घेत होता. त्यातून दोघांचे सारखे भांडणे होत होती. त्यामुळे पूजा कटारे आणी तिची आई निर्मला दयाळ चांगलीच वैतागजी होती. पुजाची आई निर्मला पांडुरंग दयाळ हिने तिचे मित्र राजेंद्र विद्याधर नितळ (वय ५४ वर्ष, राहणार बोरगाव, लातूर) दत्तात्रय नागनाथ लोंढे, (वय ५५ वर्ष, राहणार जागजी तालुका जिल्हा उस्मानाबाद.) यांना आपला जावाई मुलीला काही ना काही करणावरून मारहाण करत आसल्याची माहीती दिली होती. या दोघांनी देखील हानमंत कटारे यांना चांगले राह असा सल्ला देवून मध्यस्थी केली आसल्याची माहीती पोलिसांना मिळाली. तसेच हनमंत कटारे याचा खून झाल्यापासून हे दोघे घराकडे ओले नसल्याची गुप्त माहीती पोलिसांनी मिळवली होती. पोलिसांनी माहीती आणी तंत्रज्ञानाचा आधार घेतला असता बऱ्या गोष्टी पोलिसांच्या समोर आल्या. पोलिसांनी या प्रकरणातील अन्य संशयीत आरोपींचा माग काढण्यासाठी वेगवेगळ पोलिसांचे पथक तयार केले. स्थानिक गुन्हे शसखेचे पोलिस निरीक्षक गजानन भातलवंडे यांनी पोलिसांचे एक पथक तयार करून आरोपीच्या मागावर पाठवले. पोलिस पथकाने वेगवेगळ्या ठिकाणी सापळ लावून या खून प्रकरणातील संशयीत आरोपी राजेंद्र विद्याधर नितळ ( वय ५४ वर्ष, राहणार बोरगाव, लातूर) दत्तात्रय नागनाथ लोंढे, (वय ५५ वर्ष, राहणार जागजी तालुका जिल्हा उस्मानाबाद.) निर्मला पांडुरंग दयाळ (वय ५० वर्ष, राहणार ठोंबरे नगर, मुरुड, तालुका लातूर), पूजा हनमंत कटारे (वय ३० वर्ष, राहणार जोडजवळा, लातूर. (यातील फिर्यादी व मयताची पत्नी)करून मयत नामे हनमंत कटारे हा त्याची पत्नी पूजा कटारे हिला ताब्यात घेतले. संशयीत आरोपी राजेंद्र विद्याधर नितळ आणी दत्तात्रय नागनाथ लोंढे यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सुरूवातीला उडवा-उडवीचे उत्तरे दिली. त्यांना विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता त्यांनी आपण पैश्यासाठी हनमंत कटरे यांचा खून केल्याचे कबूल केले. हनमंत कटारे याला ठार मारण्यासाटी पूजाव तीची आई आम्हाला एक लाख रूपये देणार होती असेही कबूल केले. दरम्यान पुजा हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन सतत मारहाण करीत होता. या सततच्या मारहाणीला त्रासाला कंटाळून आई व इतर दोन पुरुषाच्या सहाय्याने पतीचा खून करून तो खून दुसऱ्या एका इसमानेच केल्याचा बनाव रचल्याचे कबूल केले. यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास गातेगाव पोलीस करीत आहेत.सदरची कामगिरी लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, लातूर ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी, सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे, गातेगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनी ज्ञानदेव सानप, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनी प्रवीण राठोड, पोलीस अमलदार संजय भोसले, सुधीर कोळसुरे, सिद्धेश्र्वर जाधव, प्रकाश भोसले, राजेश कंचे, बंटी गायकवाड, प्रदीप चोपणे, शिरीष पाटील, वाल्मीक केंद्रे, दशरथ गिरी, रामदास नाडे, जीवन राजगीरवाड, अतुल पतंगे, संजय मोरे यांनी केली आहे.

# पाथरी शहरातील रोडरोमीओचा बंदोबस्त करण्याची व्हॉईस ऑफ मिडीया पाथरी शाखेची पोलिसांकडे मागणी

## रोडरोमिओचा बंदोबस्त करणारच - पोलीस निरिक्षक बुद्धीराज सुकाळे

पाथरी/लक्ष्मण उजगरे

शहरातील शैक्षणिक संस्था व खाजगी शिकवणी वर्ग परिसरामध्ये रोड रोमिओकडून मुलींची छेड काढण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून या रोड रोडरोमिओचा पोलीस प्रशासनाकडून कायदेशीर कारवाई करत बंदोबस्त करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन व्हॉईस ऑफ मिडीयाच्या वतीने शनिवार २९ जुलै रोजी पाथरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे. पाथरी शहरात असणाऱ्या शाळा, महाविद्यालय, उच्च महाविद्यालय व खाजगी शिकवणी साठी शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी शिक्षणासाठी प्रवेश घेतलेला आहे. शहरात चांगले शिक्षण मिळते म्हणून ग्रामीण भागातील पालक आपल्या पाल्यांसह शहरातील विविध भागामध्ये वास्तव्यास आहेत. विद्यार्थ्यांना शाळा आणि शिकवणी वर्गात दाखल करून निश्चिंत असलेल्या पालकांना मात्र शहरातील वाढत चाललेल्या छेडछाडीच्या घटनांनी चिंतेत टाकले आहे. शहरातील शाळा महाविद्यालय व खाजगी शिकवणी असणाऱ्या परिसरामध्ये विकृत मानसीकतेचे



रोडरोमिओ मुले हे मुलींची छेड काढत असल्याच्या दररोज घटना घडत आहेत.त्यामुळे विद्यार्थीनीच्या मनावर अघात होत असून भिती निर्माण झाली आहे. नियमित घडणाऱ्या या घटनामुळे पालक हि अस्वस्थ व चिंताग्रस्त झाले आहेत. ग्रामीण भागातील पालक हे मुलींना पाथरी शहरामध्ये शिक्षणासाठी ठेवावे की नाही अशा विचारात आहेत. पोलीस प्रशासनाकडुन दामिनी पथक, चिडीमार पथक अश्या प्रकारचा बंदोबस्त असताना कायद्याच्या राज्यात मुली असुरक्षित असल्याची ग्रामीण व शहरी नागरिकांची भावना झाली आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने यांनी या प्रकरणी गांभीर्याने लक्ष देत एखादी मोठी घटना घडण्यापूर्वी वेळीच या शैक्षणिक अध्ययन होणाऱ्या परिसरामधील मुलींची छेड काढणाऱ्या टुकार मुलांचा शालेय व खाजगी शिकवणी वेळेमध्ये गस्त वाढवत व कायदेशीर कार्यवाही करत वेळीच बंदोबस्त करावा अशी मागणी पाथरी तालुका व्हॉईस मिडीया या पत्रकार संघटनेकडून करण्यात आली आहे. निवेदन देताना पालक प्रतिनिधी ही उपस्थित होते. दिलेल्या निवेदनावर पत्रकार गजानन घुंबरे, धनंजय देशपांडे, सुधाकर गोंगे, सिद्धार्थ वाव्हळे, विठ्ठल भिसे, नागनाथ कदम, लक्ष्मण उजगरे, रमेश बिजुले, संतोष कुलभैय्या यांच्यासह पालक आलोक चौधरी, तुकाराम वाघ, मोईज अन्सारी, विष्णु सिताफळे, संदीप छगनराव टेंगसे, युवराज आतकरे, जे.जी गिरी यांच्या स्वाक्षरी आहेत.

**रोडरोमिओचा बंदोबस्त करणारच - पोनि बुद्धीराज सुकाळे**

शहरातील मुलींच्या छेडछाडीच्या वाढत्या घटना लक्षात घेता पाथरी पोलिसांच्या वतीने या परिसरात गस्त वाढवण्यात येणार असून तीन पोलीस कर्मचारी व दोन महिला पोलीस कर्मचारी यांचे पथक नियमित शैक्षणिक परिसरामध्ये गस्त घालणार आहे. यावेळी रोडरोमिओंची गय केली जाणार नसून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार आहोत. पालकांनीही अशा घटनाही दर्शनास आल्यानंतर पुढाकार घेत पाथरी पोलीसांना संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# नादुरुस्त बसमुळे वाड्यात वाहतूक कोंडी



वाडा/प्रतिनिधी

राज्य परिवहणच्या बस नादुरुस्त होण्याचे प्रकार वारंवार घडत असून याचा त्रास प्रवश्यांना करावा लागत आहे. वाडा आगाराचा मानव विकास योजने अंतर्गत फक्त मुलींसाठी असलेली बस सकाळी वाड्याहून इंदगावच्या दिशेने निघाली असता वाडा बस स्थानकातून निघाताच तिचा स्टेअरिंग योकचा स्लीप झाल्यामुळे गाडी डाव्या बाजूला वळून जाम झाली, या घटनेत कोणालाही इजा झाली नसाळ तरी मुख्य रस्त्याच्या मध्येच बस थांबल्याने वाहतूक कोंडी झाली होती. वाडा आगाराच्या कर्मचाऱ्यांनी येऊन बस दुरुस्त केली मात्र या दरम्यान तब्बल एक तास वाहतुकीला प्रचंड मोठा अडथला निर्माण झाला होता.

## अतिवृष्टीमुळे होणारी दुर्घटनाग्रस्त परिस्थिती हाताळण्यात प्रशासन तत्पर

# दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना शासनाने तात्काळ मदत करण्याची मनसेची मागणी

उल्हासनगर/किरण तेलगोटे

उल्हासनगर शहरातील प्रभाग समिती क्रमांक १च्या हद्दीतील विनोद राजाराम शिंदे यांचे २० वर्षांपूर्वी बांधलेल्या टि-जी पद्धतीच्या घराखालील जमीनीचे भुसख्खलन झाल्याने घराचे अतोनात नुकसान झाले, घराला भेगा पडल्या तसेच एका बाजूची भिंत पडली, गॅलरीचा भाग कोसळलाये.या दुर्घटनेची माहिती सहाय्यक आयुक्त अनिल खतूराणी यांना मिळताच त्यांच्या संपूर्ण पथकासह ते घटनास्थळी तात्काळ हजर झाले. अग्निशमन विभाग यांनाही पाचारण करण्यात आले. पावसाची संततधार सुरू असतांना दुर्घटनाग्रस्त घराची पाहणी केल्यानंतर पुढील दुर्घटना टाळता यावी यासाठी अग्निशमक दलातील जवानांच्या साहाय्याने धोकादायक बाजू पाडण्यात आल्या. सदर घटनेचा पंचनामा करून शेजारील घरांना अतिदक्षतेचा इशारा तसेच पुढील अप्रिय घटना टाळता याव्या यासाठी नोटीस बजावण्यात आली. तहसील कार्यालयात ही घटनेची माहिती कळविल्यानंतर तलाठी सोनवणे यांनी ही अतिवृष्टीमुळे भुसख्खलन होऊन दुर्घटनाग्रस्त झालेल्या घरांची पाहणी करून पंचनामे तयार केले. अतिवृष्टी ही एक नैसर्गिक आपदा असली तरी निसर्गाच्या प्रकोपामुळे अनेक गोरगरिबांचे संसार उघड्यावर येतात आणि कधीही न पुसल्या जाणाऱ्या जखमा



दुर्घटनाग्रस्त परिवारांच्या मनावर घर करून राहतात. दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना शासकीय मदत उपलब्ध करून दिल्यास या कुटुंबांच्या जखमांवर फुंकर घालण्याचे काम शासनाकडून होणार असल्याने तात्काळ या कुटुंबांना मदत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मैनुद्दीन शेख यांनी शासनाकडे केलेली.

# लातूरहून साई, आरजखेडा, दर्जी बोरगाव, सांगवी, सिंधगाव, आंदलगाव या मार्गे पोहरेगाव एसटीसेवा सुरू करण्याची मागणी

लातूर/प्रतिनिधी

लातूरहून साई, आरजखेडा, दर्जी बोरगाव, सांगवी, सिंधगाव, आंदलगाव या मार्गे पोहरेगाव ही बस पुन्हा सुरू करावी, अशी मागणी विभाग नियंत्रकांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. युवा सेनेचे जिल्हाप्रमुख तथा आरजखेडा गावचे सरपंच कुलदीप सूर्यवंशी व रेल्वे बोर्डाचे सदस्य निजाम शेख यांनी राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्वज्जीत जानराव यांना याबाबत निवेदन दिले. दोन वर्षांपूर्वी मागणी केल्यानुसार ही बस सुरू करण्यात आली होती. कोविड कालावधीत बस वाहतूक बंद करताना ती बंद करण्यात आली. नंतर ही बस सुरूच करण्यात आली नाही.या मार्गावरून शिक्षणासाठी लातूर येथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या आहे. याशिवाय संबंधित गावातून प्रवासाची इतर कुठलीही साधने नाहीत. त्यामुळे ही बस सुरू झाली तर महामंडळाच्या उत्पन्नातही भर पडणार असल्याचे कुलदीप सूर्यवंशी व निजाम शेख यांनी विभाग नियंत्रकांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत सकारात्मक विचार करून चार दिवसात ही बस सेवा सुरू केली जाईल,असे आश्वासन विभाग नियंत्रकांनी दिले.त्यामुळे सूर्यवंशी व शेख यांनी विभाग नियंत्रकांचे आभार मानले.

## थोडक्यात वृत्तांत

### रेणा सहकारी साखर कारखान्यात मील रोलर पुजन

रेणापूर : अल्पावधीतच आपल्या यशस्वी वाटचालीतून साखर उद्योगात नाव लौकिक प्राप्त केलेल्या रेणा सहकारी साखर कारखाना गळीत हंगाम २०२३-२४ साठीच्या मील रोलरचे पुजन कारखान्याचे संस्थापक व मार्गदर्शक माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या शुभ हस्ते पार पडले. यावेळी राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, माजी चेअरमन यशवंतराव पाटील, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे, संतशिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन गणपतराव बाजूळगे, रेणाचे व्हा.चेअरमन अनंतराव देशमुख, संचालक तानाजी कांबळे, सतिश पाटील, कार्यकारी संचालक बी. व्ही. मोरे,खाते प्रमुख, अधिकारी कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

### जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा-महसूल अदालत

पालघर : महसूल विभागामार्फत राज्यात दिनांक १ ऑगस्ट २०२३ ते ७ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. तरी, अपर जिल्हाधिकारी पालघर यांचे न्यायालयात चालू असलेल्या जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या तालुक्यांमधील महसूल अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये (RTS ppcal) अपिलाच (वादी) व सामनेवाले (प्रतिवादी) यांना आपसांत तडजोड करावयाची असल्यास संबंधीत पक्षकार व त्यांचे विद्वान विधिज्ञ यांनी आपसांत तडजोड झाल्याबाबत लेखी अर्ज, तडजोडनामा, पुरसीस घेवून व्यक्तीश: अपर जिल्हाधिकारी कार्यालय जव्हार येथे दिनांक ०३/०८/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन भाऊसाहेब फटांगरे अपर जिल्हाधिकारी पालघर यांनी केले आहे.

### वसई, पालघर, डहाणू व तलासरी-महसूल अदालत

पालघर : महसूल विभागामार्फत राज्यात दिनांक १ ऑगस्ट २०२३ ते ७ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. तरी, अपर जिल्हाधिकारी पालघर यांचे न्यायालयात चालू असलेल्या वसई, पालघर, डहाणू व तलासरी या तालुक्यांमधील महसूल अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये (RTS ppcal) अपिलाय (वादी) व सामनेवाले (प्रतिवादी) यांना आपसांत तडजोड करावयाची असल्यास संबंधीत पक्षकार व त्यांचे विद्वान विधिज्ञ यांनी आपसांत तडजोड झाल्याबाबत लेखी अर्ज, तडजोडनामा, पुरसोस घेवून व्यक्तीश: जिल्हाधिकारी कार्यालय पालघर अपर जिल्हाधिकारी पालघर यांचे दालन क्र.१०९मध्ये दिनांक ०४/०८/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता उपस्थित राहावे. असे आवाहन भाऊसाहेब फटांगरे अपर जिल्हाधिकारी पालघर यांनी केले आहे.

### 'सारथी'च्या इमारतीचा १७२ कोटींचा आराखडा मंजूर

लातूर : छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) लातूर विभागीय कार्यालयाच्या इमारतीसाठी १७२ कोटी ८६ लाख ९४ हजार ९१५ रुपयांच्या अंदाजपत्रकास व आराखड्यास शासनाच्या उच्चाधिकार समितीने मान्यता दिली आहे. यामध्ये मुला-मुलींचे वसतिगृह, अभ्यासिका, ग्रंथालय, प्रशिक्षण केंद्रासाठी सभागृह बांधकाम व इतर अनुषंगिक बाबींचा समावेश आहे. 'सारथी'साठी विभागीय कार्यालयासाठी लातूर तालुक्यातील वरवंटी येथील मुलींची औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या जागेपैकी १.६० हे.आर. जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याठिकाणी 'सारथी'च्या विभागीय कार्यालयासह मुला-मुलींचे वसतिगृह, अभ्यासिका, ग्रंथालय, प्रशिक्षण केंद्रासाठी सभागृह बांधकाम करण्यासाठी उच्चाधिकार समितीने १७२ कोटी ८६ लाख ९४ हजार ९१५ रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाने २० जुलै २०२३ रोजी निर्गमित केला आहे.

## वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | दिनांक | अनुसुचित दोन/तीन मधील नोटिसीची मालमत्ता क्रमांक | करनिर्धारण पुस्तकातील वॉर्ड क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | २८/०६/२३ | ९४५/२१ | ०६ | कांतीलाल जे. पटेल | उर्मिला कांतीलाल पटेल |
| २. | २८/०६/२३ | २०६१/५ | ०६ | मिना विजय घोडके | रेश्मा गोविंद साने |
| ३. | २८/०६/२३ | १५८३/६३६ | ०६ | प्रशांत ज्ञानेश्वर दोडे | विजय राजाराम चव्हाण / दिक्षा विजय चव्हाण |
| ४. | २८/०६/२३ | २१३१/९ | ०६ | रुपेश शिवाजी फुलसुंदर | प्रणव वसंत पिंपळे / वसंत बाबाजी पिंपळे |
| ५. | २८/०६/२३ | ११६२/२० | ०६ | संतोष शांताराम आग्रे | हेमकांत नरेंद्र पंडित |
| ६. | २८/०६/२३ | १७४९/७७ | ०६ | वंदना गणपत धुरे | सोनम संतोष पाखर |
| ७. | २८/०६/२३ | २२६७/३२ | ०६ | साई गणेश इंटरप्राइजेस | राकेश रामचंद्र खानविलकर |
| ८. | २८/०६/२३ | २२६७/८ | ०६ | साई गणेश इंटरप्राइजेस | विठ्ठल आप्पा कातकर/ विद्या विठ्ठल कातकर |
| ९. | २८/०६/२३ | २२६७/१९ | ०६ | साई गणेश इंटरप्राइजेस | मारुती हरी पाटील |
| १०. | २८/०६/२३ | १७७२/४२ | ०६ | विजय नारायण मयेकर | राहुल रमाकांत जाधव / ममता राहुल जाधव |
| ११. | २८/०६/२३ | २२६७/९ | ०६ | साई गणेश इंटरप्राइजेस | रश्मी कृष्णा यादव |
| १२. | २८/०६/२३ | २८/७१ | २३ | श्याम नरहर संखे | रोहन सु. खंडागले/रोहित सु.खंडागले/शकुंतला सु.खंडागले |
| १३. | २८/०६/२३ | २०८३/५१ | ०६ | निता देढिया | प्रकाश बा. तांबे / प्रांजल प्र. तांबे |
| १४. | २८/०६/२३ | १५७/१० | ०८ | शितल बुसन पिंपळे | राजेश बबन माळी |
| १५. | २८/०६/२३ | २२६७/३६ | ०६ | साई गणेश इंटरप्राइजेस | वैदहि भरत गुरव |
| १६. | २८/०६/२३ | २२६७/३४ | ०६ | साई गणेश इंटरप्राइजेस | सुनिल भगवानजी नागु |
| १७. | २८/०६/२३ | १२६/२८४ | ०८ | रश्मी गार्डन प्रा.लि. | भावना प्रशांत भिसे |
| १८. | २८/०६/२३ | १९५५/५१ | ०६ | जगन्नाथ सिताराम सकपाळ | रुपेश सदाशिव कार्शिकर |
| १९. | २८/०६/२३ | १०१३/८० | ०६ | बिंदिया शांताराम कांबळे | सुभाष धोंडी पिखरे / राखी सुभाष पिखरे |
| २०. | २८/०६/२३ | ८५/३६ | ०८ | दिनेश जयराम घोले | दिपक शामु शिंदे / शांती दिपक शिंदे |

जावक क्र. वविशम/कर/२०१०/२०२३-२४
दिनांक : २७/०७/२०२३

सही/-
**प्र.सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; नागरिकांनी दिला चोप

पाथरी/लक्ष्मण उजगरे

शहरातील रस्त्यावर एका अल्पवयीन मुलीचा हात धरून अश्लील चाळे करत विनयभंग केल्याची चिड आणणारी घटना शुक्रवार २८ जुलै रोजी घडली असुन या घटनेनंतर आरोपीला घटनास्थळावर नागरिकांनी चांगलाच चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिले. पिडीत अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरोधात पोक्सो, ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. शहरामध्ये शालेय विद्यार्थिनी व मुलींच्या छेडछाडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शुक्रवार २८ जुलै रोजी सकाळी १० वाजता सुमारास शहरातील शिक्षक कॉलनी कडे जाणाऱ्या रस्त्यावर एका अल्पवयीन मुलींचा विकृत मानसिकतेच्या आरोपाने मनात लज्जा उत्पन्न व्हावी अशा हेतून हाताला धरून विनयभंग केला यावेळी आरोपीने अश्लील कृत्य करत पीडित मुलीच शिवीगाळ केली. दरम्यान यावेळी स्थानिक नागरिकांनी आरोपी चांगला चोप देत पाथरी पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी मुलीने तक्रार दिल्यानंतर आरोपी शेख वाजेद शेख साजेद रा.एकतानगर पाथरी विरुद्ध विविध कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये बाल लैंगिक अत्याचार व ॲट्रॉसिटी अंतर्गत ही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील ओव्हळ करत आहेत.

# रांजणगाव खुरी येथे शेतकरी पती व पत्नीने गळफास घेऊन संपवले जीवन

पैठण/प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील रांजणगाव खुरी येथील शेतकरी पती पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. गुरुवारी कोल्हापूर जिल्ह्यात व्हनगुत्ती येथील पती-पत्नीने दोन व्यक्तींकडून आर्थिक फसवणूक झाल्यावरून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली होती. या घटनेला काही तास उलटत नाही तोच अशीच एक घटना छत्रपती संभाजीनगरमधून समोर आली आहे. रांजणगाव खुरी येथील शेतकरी दाम्पत्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.सदर घटनेची मिळालेली प्राथमिक माहिती अशी की तालुक्यातील रांजणगाव खुरी येथील दर्गा परिसरात तरुण पतीपत्निने गळफास घेत आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. राजू दामोधर खंडागळे (वय वर्ष अंदाजे २८) तर पत्नी अर्चना राजू खंडागळे (वय वर्ष २२ ते २३) अशी दोघांची नावे समजतात. मिळालेली माहिती अशी की २८ जुलै शुक्रवार रोजी दोघे पती पत्नी सकाळी शेतात गेले होते. सायंकाळी अंधार पडला तरी घरी न आल्याने कुटुंबातील सदस्य त्यांना शोधत शेतात गेल्यावर



सगळा प्रकार उघडकीस आला.साधारण ६ ते ६:३० वाजेदरम्यान दर्गा ते शेंदूर वादा रोडवरील शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. नातेवाईक व गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत दोघांना बिडकिन ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. बिडकिन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश सुरवसे यांना घटनेची माहिती समजताच तात्काळ घटनास्थळी व ग्रामीण रुग्णालयात धाव घेत घटनेची पाहणी केली. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार बिडकिन पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. सदरील घटनेच्या पुढील तपास बिडकिन पोलीस हे करीत आहे.

31 JULY TO 06 AUGUST 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 7/29/2023 9:23 PM Page 1



# मणिपूर जळत असताना...

'रोम जळत असताना निरो फिडल वाजवत होता' अशी एक म्हण आहे आणि ती भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आजच्या तारखेला तंतोतंत लागू होत आहे. याचे कारण असे की गेल्या तीन महिन्यापासून मणिपूरमध्ये जातीय हिंसा भडकलेली असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी त्याकडे अजिबात लक्ष द्यायला तयार नाही. त्याचबरोबर या भयंकर घटनेबाबत संसदेत निवेदन करायलाही त्यांना वेळ नाही. एरवी जगभर भटकायला त्यांना वेळ आहे, पण मणिपूरच्या घटनेकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही, ही खरोखरच देशाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. मणिपुरमध्ये भाजपचे सरकार आहे. परंतु या सरकारवर कोणतीही कारवाई करायची केंद्रातील भाजपा सरकारची इच्छा नाही. हेच जर राजस्थान, छत्तीसगड, पश्चिम बंगाल किंवा विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या इतर राज्यांमध्ये घडलं असतं तर सगळे भाजपवाले हाय तोबा बाप करीत रस्त्यावर उतरले असते. त्याचबरोबर या घटनेचे भांडवल करीत केंद्र सरकारने ताबडतोब त्या राज्यातलं सरकार बरखास्त केलं असतं. परंतु एवढ्या भयानक घटना घडलेल्या असताना केंद्र सरकार मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांवर किंवा तिथल्या सरकारवर कारवाई करायला तयार नाही यालाच म्हणतात पक्षपाती राजकारण आणि या पक्षपाती राजकारणाचा २०२४ च्या निवडणुकीत मोदींना जबाब द्यावा लागेल. मोदी आणि त्यांचा भाजपा स्वतःला हिंदुत्ववादी म्हणून घेतात पण हिंदू संस्कृतीत स्त्रीला साक्षात देवी मानलेली आहे. या देवीची वेगवेगळ्या रूपात पूजा केली जाते. पण मणिपूरमध्ये याच देवीची ज्या पद्धतीने विटंबना करण्यात आली ते पाहून संपूर्ण देश हा हादरला आहे. मणिपूरमध्ये दोन महिलांची विवस्त्र कडून करून धिंड काढण्यात आली. त्यानंतर त्या महिलांवर लैंगिक अत्याचार करण्यात आले. एवढं सगळं घडूनही केंद्र सरकार जर बघ्याची भूमिका घेत असेल तर त्यांना एक मिनिट ही सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. मुळात मणिपूरचा प्रश्न केंद्र सरकारने निर्माण केलेला आहे. त्यामुळे तो सोडवण्याची जबाबदारी अर्थातच केंद्र सरकारवर आहे. पण केंद्र सरकार मणिपूरबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर द्यायला तयार नाही. मनिपुरबाबत कोणी प्रश्न विचारला की ताबडतोब पश्चिम बंगालचे उदाहरण दिले जातात, हा प्रकार म्हणजे एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारण्यासारखा आहे. राहता राहिला सवाल मणिपूर आणि पश्चिम बंगालमध्ये हिंसाचाराच्या तुलनेचा तर मणिपूरमध्ये गेल्या तीन महिन्यापासून जे काही घडत आहे. तेवढं पश्चिम बंगालमध्ये घडलेलं नाही. पण तरीही मणिपूरच्या हिंसाचाराची केंद्र सरकार आणि भाजपवाले पश्चिम बंगालमधील हिंसाचाराशी तुलना करून या संपूर्ण प्रकरणातून आपली जबाबदारी झटकत आहेत. मणिपूर मधील हिंसाचाराला भाजप प्रणित हिंदुत्ववादी संघटनांचे प्रचारक कारणीभूत आहेत आणि गेल्या काही वर्षांपासून ईशान्य कडील मणिपूर, त्रिपुरा, नागालँड, आसाम, मिझोराम या राज्यांमध्ये हिंदुत्ववादी प्रचारक फिरत आहेत आणि ते त्या ठिकाणी हिंदुत्वाचा प्रसार करीत आहेत त्याचबरोबर तिथल्या अल्पसंख्यांकांच्या विरोधात हिंदूंना फडकवत आहे. त्यामुळेच मणिपूरमध्ये हिंदुत्ववादी मताई समाज आणि आदिवासी नागा व कुकी यांच्यात संघर्ष ऊफाळून आला. आणि या संघर्षामध्ये आत्तापर्यंत दीडशेहून अधिक लोकांचा बळी गेलाय, मताई समाजाच्या लोकांनी आदिवासी कुकी आणि नागा जमातीच्या लोकांवर हल्ले केले. त्यांच्या घरादारांना आगी लावल्या. त्यांना गावागावातून हाकलून दिले आणि आता तर तिथल्या महिलांना टार्गेट केले जात आहे. कारण हे आदिवासी धर्मांतरित ख्रिश्चन आहेत आणि मणिपूरमध्ये ते अल्पसंख्यांक असल्यामुळे सरकारने त्यांना विशेष सवलती दिलेल्या आहेत आणि याच सवलती काढून घेण्यासाठी हिंदुत्ववादी मताई समाजाचे लोक मणिपुरमध्ये हिंसाचार घडवून अल्पसंख्याकांना तिथून पळवून लावायच्या मार्गावर आहेत. अशावेळी केंद्र सरकारने हस्तक्षेप करणे आवश्यक होते. परंतु आपले सरकार अडचणीत असताना त्या सरकारची पाठ राखण करणे आणि ते सरकार वाचवणे हा आपला धर्म आहे असे भाजपला वाटते, म्हणूनच त्यांनी मणिपूरमध्ये अजूनपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. सध्या पावसाळी अधिवेशनात याच मुद्यावरून विरोधी पक्ष आक्रमक झालाय. अशावेळी पंतप्रधान मोदींनी संसदेत निवेदन करायला हवे होते, पण पंतप्रधान अडचणीच्या प्रश्नांवर कधीही संसदेत बोलत नाहीत. एरवी देशात आणि परदेशात दोन दोन तास भाषण ठोकणारे पंतप्रधान संसदेत अदानीच्या प्रश्नावर तसेच मणिपूरच्या स्फोटक प्रश्नावर का बोलायला तयार नाहीत? हा एकच प्रश्न संपूर्ण देश आज मोदींना विचारतोय. कारण मणिपूरच्या प्रश्नावर पंतप्रधान संसदेत निवेदन करायला तयार नाहीत, म्हणून विरोधकांनी गेल्या चार-पाच दिवसापासून संसदेचे काम रोखून धरले आहे आणि आता शेवटचा पर्याय म्हणून केंद्र सरकारवर अविश्वासाचा ठराव दाखल केला आहे. विरोधकांना ठाऊक आहे की आपला अविश्वासाचा ठराव मंजूर होणार नाही. कारण केंद्रातील मोदी सरकारकडे पाचवी बहुमत आहे असे असतानाही विरोधी पक्षाने अविश्वास ठराव दाखल करण्यामागे एकच कारण आहे ते म्हणजे पंतप्रधानांना तोंड उघडायला लावणे. कारण अविश्वास ठराव दाखल झाल्याच्या नंतर जेव्हा त्याच्यावर चर्चा होते, त्या चर्चेला उत्तर देणे पंतप्रधानांना बंधनकारक असते आणि केवळ यासाठीच विरोधकांनी अविश्वासाचा ठराव आणलेला आहे. त्यामुळे आता पंतप्रधानांना मणिपूरचा प्रश्नावर संसदेत तोंड उघडावेच लागेल. विरोधकांच्या या रणनीतीचे देशभर कौतुक केले जात आहे. कुठल्या ना कुठल्या मार्गाने का होईना त्यांनी पंतप्रधानांना संसदेत तोंड उघडायला भाग पाडले आहे. आता संसदेत अविश्वास प्रस्तावाला उत्तर देताना पंतप्रधान काय खुलासा करतात मणिपूरबाबत त्यांच्या पक्षाची आणि केंद्राची काय भूमिका आहे हे जाणून घेण्याची संपूर्ण देशाला उत्सुकता आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे मणिपुरला जाऊन आले. पण त्यांनी तिथे कुठलीही कारवाई केली नाही. उलट मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांना अभय देण्याचं काम अमित शहा यांनी केले असा तिथल्या लोकांचा आरोप आहे. आता विरोधी पक्षाचे शिष्टमंडळ मनिपुरला गेलेले आहे. विरोधी पक्षाचे नेते तिथल्या स्थानिक जनतेशी बोलणार आहेत, त्याच्या समस्या जाणून घेणार आहेत आणि त्यानंतर मणिपूरचा सद्यस्थितीचा आँखो देखा का हाल ते संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मांडणार आहेत. त्यामुळे मणिपूरमध्ये नेमके काय झाले ते देशाला कळू शकेल आणि देशातील जनतेच्या मनात मोदी सरकारच्या विरोधात जो आज असंतोष खदखद तू आहे त्याचा २०२४च्या निवडणुकीत स्फोट होईल, तेव्हाच या देशाची आणि या देशातील १४० कोटी जनतेची जातीयवाद्यांच्या तावडीतून सुटका होईल. वास्तविक मणिपूर सारख्या छोट्या राज्यांमध्ये उद्योग धंद्याचे जाळे निर्माण करून तिथल्या तरुणांना रोजगार मिळवून देण्याचे काम राज्यातील भाजपा सरकारने केंद्र सरकारच्या मदतीने करायला हवे होते. पण तसे न करता राज्यात बहुसंख्यांक माहिती आणि अल्पसंख्याक कुकी समाजात भांडण लावण्याचे काम स्थानिक भाजपा सरकारने केले. त्यामुळेच गेल्या तीन महिन्यापासून मणिपुर जळते. मणिपूरच्या वेदना किती त्रासदायक आहेत हे मणिपूर मधील आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या प्रतिक्रियांमधून दिसून आले आहे. भारताला मोठमोठ्या स्पर्धामध्ये सुवर्ण रौप्य पदक मिळवून देणारी महिला बॉक्सर मेरी कोम हिने तर पंतप्रधान मोदींना पत्र लिहून माझे मणिपुर जळते त्याला वाचवा अशी कळकळीची विनंती केली होती. ऑलिंपिक पारितोषिक विजेती भेटली तर मीराबाई चानू हिने ही पंतप्रधानांना मणिपूरमध्ये लक्ष घालून तिथला हिंसाचार थांबवण्याची विनंती केली होती. त्या खेळाडूंनी जगात भारताचे नाव रोशन केले त्या खेळाडूंच्या विनंतीकडे लक्ष द्यायला ही पंतप्रधान मोदींना वेळ नाही. त्या दाढीवाल्या रामदेव बाबाच्या योगाचा प्रचार करीत पंतप्रधान जगभर फिरत आहेत. त्यासाठी त्यांना भरपूर वेळ आहे, पण मणिपूरकडे लक्ष द्यायला वेळ नाही. लोकांना हे सगळं कळतंय. त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीत सत्ता परिवर्तन अटळ आहे. भाजपावाल्यांनी किती जरी काही दावे केले किंवा त्यांच्या ताटाखालचे मांजर बनलेल्या इलेक्ट्रॉनिक मीडियाने भाजपाची किती जरी तरी उचलून धरली तरी मणिपूर सारख्या घटना लोक विसरलेले नाहीत आणि विसरणार ही नाहीत. मणिपूरमध्ये उसळलेल्या हिंसाचाराचा, तिथे बैलांवर झालेल्या अत्याचाराची भारतातील १४० कोटी जनतेने नोंद घेतलेली आहे. त्यामुळे मणिपूर जळत असताना केवळ तमाशा बघणाऱ्या पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या भाजपाचे आता काउंटडाऊन सुरू झालेले आहे. २०२४ च्या निवडणुकीत लोक त्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. मणिपूरमध्ये मारल्या गेलेल्या गिरापुरात शेकडो लोकांच्या आत्म्यांचा तळतळाट मोदी सरकारला लागल्याशिवाय राहणार नाही. परिणामी २०२४ मध्ये या देशात सत्तांतर अटळ आहे आणि मणिपूर हा त्याचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

# इतर मागासवर्गीय युवक आणि युवतींना उद्योजक होण्यासाठी महामंडळाचा हात!!

महाराष्ट्र राज्य हे नेहमीच कल्याणकारी योजना सुरु करण्यात आणि त्या राबविण्यात अग्रेसर आहे. शेवटच्या माणसाचे कल्याण हे उद्देश ठेवून शासन काम करते. काही वर्षापूर्वी इतर मागासवर्गीय समाजाच्या उन्तीसाठी नवीन मंत्रालय सुरु केले, महामंडळही सुरु केले. त्या महामंडळाच्या वतीने युवक-युवतींना व्यवसायीक, उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी योजना सुरु केल्या. त्या सर्व सामान्यांना कळाव्यात म्हणून म्हणून ही माहिती देत आहेत.

बीजभांडवल योजना : बीजभांडवल योजना राष्ट्रीयकृत बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातुन राबवीण्यात येते. यात महामंडळाचे कर्ज २० टक्के बँकेचे कर्ज ७५ टक्के व लाभार्थीचा सहभाग ५ टक्के असतो. कर्ज सहभागांची रक्कम बॅकेने एकुण मंजुर केलेल्या कर्ज रकमेवर असते. कर्ज रक्कम मर्यादा रु.५ लक्ष. कर्ज फेडीची कालमर्यादा ५ वर्षे. व्याजदर महामंडळाच्या सहभाग रकमेवर ६ टक्के व बँकेच्या सहभाग रकमेवर प्रचलीत बँक व्याज दरानुसार. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष पर्यंत. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे.

थेट कर्ज योजना : थेट कर्ज योजना महामंडळामार्फत राबवण्यात येते. कर्ज मर्यादा रु. १ लक्ष. अर्जदाराचा सिबील स्कोअर किमान ५०० इतका असावा. वय १८ ते ५५ वर्षे. परत पफेडीचा कालावधी ४ वर्षे. नियीमत कर्ज परतपफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारले जाणार नाही . (हप्ता मासीक रु.२०८५) तथापी थकीत कर्ज रकमेवर ४ टक्के व्याज आकारण्यात येते. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष पर्यत.

वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना : सदर योजना बँके मापर्फत राबवीण्यात येते. कर्ज मर्यादा रु.१० लक्ष. महामंडळाच्या वेबपोर्टल / संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष पर्यत. कर्ज परतपफेडीचा कालावधी बँक निकषानुसार. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थीच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. पात्र लाभार्थीस एल.ओ.आय.(ङर्शींीशी जष खपींशपीं) दिले जाईल. त्याआधारे बँकेकडून कर्ज मंजूर करुन घ्यावे लागेल.

गट व्याज परतावा योजना : गट व्याज परतावा योजना बँकेमार्फत राबविण्यात येते. महामंडळाच्या निकषानुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील बचतगट भागीदारी / सहकारी संस्था शासन प्रमाणीत. कर्ज मर्यादा रु.१० लक्ष ते ५० लक्ष. महामंडळाच्या वेबपोर्टल / संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य. गटातील सर्व लाभार्थीचे खाते आधार लिंक असणे अनिवार्य. गटातील लाभार्थीचे वय १८ ते ४५ वर्षे. गटातील भागीदारांचे खाते किमान रु. ५०० कोटींच्यावर ठेवी असलेल्या व कोअर बँकींग सिस्टीम असलेल्या राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेत खाते असावे. गटातील सदस्यांनी यापुर्वी महामंडळाच्या वा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेतलेला नसावा. गटातील सर्व सदस्यांचा सिबील स्कोअर किमान ५०० असावा. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे वा कर्ज कालावधी यापैकी जो कालावधी कमी असेल तो. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थीच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. पात्र गटास एल.ओ. आय. दिले जाईल. त्या आधारे बँकेकडुन कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल.

शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना : शैक्षणीक कर्ज व्याज परतावा योजना बँकेमापर्फत राबवण्यात येते. बँक कर्ज रकमेवरील व्याज परतावा. देशांतर्गत व परदेशी उच्च शिक्षणासाठी रु.१० लक्ष व २० लक्ष पर्यत अनुक्रमे. विद्यार्थीचे वय १७ ते ३० वर्षे. अर्जदाराची कौटुंबीक वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष. अर्जदार १२ वी ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा. देशांतर्गत अभ्यासक्रम: आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायीक व व्यवस्थापन, कृषी, अन्नप्रक्रीया व पशुविज्ञान, परदेशी अभ्यासक्रम: आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायीक व व्यवस्थापन बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या कर्जामध्ये फक्त शैक्षणीक शुल्क, पुस्तके व साहीत्य खरेदीचा सामावेश राहील. परदेशी अभ्यासक्रमांसाठी QS (Quacquarelli Symonds) रॅकींग / गुणवत्ता निकषांनुसार संस्थेचे स्थान २०० पेक्षा आतील. परदेशी अभ्यासक्रमाकरीता पात्र परिक्षा GRE (Graduate Record), TOEFL (Test of English as Foreign Language) परीक्षा उत्तीर्ण.

पात्रतेचे निकष : लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा इतर मागासवर्गीय रहीवासी असावा. तो महामंडळाचा, बँकेचा अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्याचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा. कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे रहातील.

अर्जासोबत जोडवयाच्या कागदपत्रांचा तपशिल : उत्पन्नाच्या दाखल्यासोबत सक्षम अधिकाऱ्याने अर्जदार प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती. जातीचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकेची प्रमाणीत प्रत, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो. व्यवसाय स्थळाची भाडेपावती, करारनामा, सातबारा, उतारा, लाईट बील प्रत. शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचा दाखला. दोन जामिनदारांचे हमीपत्र अथवा गहाणखत. स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबत 'ना हरकत प्रमाणपत्र तसेच ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजुर होणार आहे त्या प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र. तांत्रिक व्यावसायाकरिता आवश्यक असतील असे परवाने/ लायसन्स. व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, लागणारा कच्चा माल, यंत्र सामुग्री इत्यादींचे दरपत्रक. महामंडळाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कागदपत्रांचा तपशील. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ महामंडळाच्या इतर मागास प्रवर्गातील सुशिक्षीत व बेरोजगारासाठी कृषी, व्यापार व उद्योग सुरु करण्यासाठी खालील प्रमाणे कर्ज योजना राबविल्या जातात. योजनांच्या अधिक माहिती व इतर तपशीलासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ म. पहिला मजला, जात पडताळणी इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट समोर, गुळ मार्केट, लातुर या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्य इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि. लातूरचे जिल्हा व्यवस्थापक पी.सी. पोहरे यांनी आवाहन केले आहे.

कौशल्य विकास प्रशिक्षण योजना : राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील परंपरागत व्यवसायाचे आधुनिकीकरण झालेले असल्यामुळे त्या परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या इतर मागासवर्गीय समाजातील पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणाचा लाभ व्हावा तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन त्यांना कौशल्यपुर्ण बनविणे व त्याव्दारे रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे. शिक्षण १० वी उत्तीर्ण. महामंडळाच्या चडडऊ्ड च्या वेबपोर्टलवर उमेदवाराने नांव नोंदणी करणे अनिवार्य आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, एकत्र कुटुंबाचे उत्पन्न प्रमाणपत्र (८ लक्ष पर्यत) वयाचा दाखला, रहिवासी दाखला, आधार कार्ड अपलोड करावे लागेल. बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या सेवा, नोकऱ्यांची मागणी विचारात घेऊन प्रशिक्षण अभ्यासक्रम महामंडळामार्फत निवडण्यात येईल. महामंडळाने निवड केलेल्या अभ्यासक्रमातुन उमेदवारास त्याच्या कल चाचणीच्या आधाराव अभ्यासक्रमाची निवड करता येईल. स्किल इंडीया पोर्टलवर नोंदणी केलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. संपुर्ण प्रशिक्षण महामंडळामार्फत देण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान दैनंदिन हजेरी अनिवार्य राहील.

# पर्यावरणाचे काय आणि त्याचे महत्त्व!

आपल्या आजूबाजूला असणाऱ्या सर्व गोष्टी यांचा समावेश आपण पर्यावरणामध्ये करतो नदी-नाले पशुपक्षी, डोंगर, इकडे, वृक्ष वेली इत्यादी सर्वांचे मिळून पर्यावरण बनने मनुष्य सारखा म्हणतो की मनुष्य हा निसर्गातील सर्वात श्रेष्ठ सजीव आहे पण तरीदेखील तो पर्यावरणाचा फक्त एक भाग आहे. यावरून पर्यावरणाची व्याप्ती आपल्याला लक्षात येते. माणसाने कितीही प्रगती केली, कितीही उच्च झाला तरीदेखील निसर्गाच्या शक्तीपुढे आपण क्षुल्लकच आहोत. आपले संपूर्ण आयुष्य हे पर्यावरणाच्या आतच सुरू होते आणि संपते. म्हणून पर्यावरण चांगले राहिले तस्य मनुष्य प्राणी तसेच इतर सर्व सजीवही सुस्तासमाधानाने राहू शकतील. पर्यावरणाचे आपण नीट रक्षण केले तरच आपले रक्षण होईल. नाहीतर पर्यावरणाच्या नष्ट होण्याबरोबरच संपूर्ण सजीव सृष्टीही नष्ट होऊन जाईल.

पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. त्यासाठी मोठमोठे कामे करण्याची गरज नाही खूप तर छोटी छोटी कामे नित्यनेमाने व प्रामाणिकपणे करणे गरजेचे आहे. पर्यावरण रक्षणाच्या कामांमध्ये स्वच्छता, वृक्ष लागवड पाण्याची बचत, वीज बचत रासायनिक खतांचा कमी वापर इत्यादी प्रकारच्या कामांचा समावेश करता येईल. स्वतःच्या स्वार्थापोटी मानवाने भरमसाठ वृक्षतोड केली हिरवाईने नटलेली सर्व जंगले नष्ट होऊन आता सिमेंट काँक्रीटची उष्ण जंगले निर्माण झाली आहेत पर्यावरण रक्षणाच्या कामी. शासनानेही अनेक उपक्रम राबवले, आता दरवर्षी वृक्ष लागवडीचे नवीन नवीन उच्चांक गाठले जाताना आपल्याला दिसतात, परंतु प्रत्यक्षात मात्र तितके झाडे जगण्याचे प्रमाण दिसत नाही. पृथ्वीवर सजीव निर्जीव, साधनसंपत्ती उपलब्ध आहे, त्यान हवा, पाणी, ऊर्जा, जमीन, भाग, सागर भाग, हवामानाचे घटक प्राणी, पक्षी, सर्व सजीव, सर्व प्रकारच्या वनस्पती, शेतातील पिके खनिजे अशा मानवा भौतालच्या जीवनास आवश्यक सर्व घटकांचा समावेश नैसर्गिक साधन संपत्ती मध्ये केला जातो. या साधन संपत्तीचा मानवाने असाच चुकीच्या पद्धतीने वापर केला तर विनाश ठरलेलाच आहे. 'मानवाच्या बेताल वागण्यामुळे पृथ्वीची उष्णता वाढन आहे भूपृष्ठ लगत वातावरणातील तापाबर या थरांत जिवसृष्टी राहते.

सजीवांना उपयुक्त हवेचे घटक, पाणी इत्यादी पोषक प्रमाणात उपलब्ध आहे याच यशनील कार्बन- प्राणवायू म्हणजेच ऑक्सिजन, हायड्रोजन, नायट्रोजन इत्यादी वायूंचे तू-डाय- ऑक्साईड, निसर्ग नियंत्रित व निसर्गनिर्मित प्रमाण ठरलेले आहे. त्यान मानवी हस्तक्षेपणामुळे वाढ किंवा घट झाली तर नुकसान होते. यंत्रामधील खनिज तेल, कोळया, इंधन ज्वलन प्रदूषणातून ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन कार्बन डायॉक्साईडचे प्रमाण वाढले तर त्यांच्या उपलब्ध मर्यादांमध्ये अस्थिरता निर्माण होईल. वनस्पतींचे जंगलांचे प्रमाण कमी झाल्यामुळे प्राणवायु व कार्बन डाय-ऑक्साइड वायू यांच्यात असंतुलन निर्माण होते. तापमानातील वाढू किंवा घट ही युध्दजन्य परिस्थितीमुळे, अनुस्फोट घडविल्याने तसेच कारखानदारीच्या प्रदूषण वाढीमुळे घडून येते म्हणून निसर्गाने प्रत्येक घटकांच्या मर्यादा ठरविलेल्या आहेत. या मर्यादांचे उल्लंघन मानवाकडून होऊ नये यासाठी खास प्रयत्नांची गरज आहे.

जंगल तोड व कारखानदारी वाहनांमध्ये वाढ यांच्यामुळे पृथ्वीवर प्रदूषण वाढते आहे व त्याचा परिणाम पृथ्वीच्या उष्ताता वाढीमध्ये (global warming) झालेला आहे. व त्याचा परिणाम कारखानदारीतील वाढ व होणारे प्रदूषण यांच्यावर नियंत्रण केले नाही तर निसर्गाकडील सजीवांची पोषण मर्यादा संपून जाईल.त्यासाठी जंगलक्षेत्रात वाढ करून पर्यावरण संतुलन राखणे आवश्यक आहे. साधनसंपत्तीच्या संवर्धनाच्या दृष्टीने साधन संपत्तीचा वापर करणे बंद करावे. असा त्याचा अर्थ नाही तर या साधन संपत्तीचा वापर योग्य व काळजीपूर्वक करावा, विनाश टाळावा शोषण थांबवावे टाकावू लोखंड प्रक्रिया करून पुन्हा वापरावे दिवसेंदिवस निसर्ग संपत्तीची वाढत जाणारी मागणी विचारात घेता साधन संपत्ती कायम टिकून राहावी या हेतूने जंगलतोड थांबवावी चराई बंद करावी, ऊर्जेचा वापर योग्य व कमी प्रमाणात करावा जलसाक्षरता पाणी आडवा, पाणी जिरवा, झाडे जगवा इत्यादी कार्यक्रमात सहभागी होऊन नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करावे. पाणी जमीन खनिजे इत्यादी सर्व घटकांचा वापर नियोजनपूर्वक करावा तुषार व ठिबक सिंचन वापरावे नैसर्गिक रखने वापरावीत. पर्जन्य जलाचे संचयन करावे. सौर व पवन ऊर्जेचा वापर वाढवावा. वृक्षारोपण करावे बची हरित पट्टा विकसित करावा. सेंद्रिय कच-यापासून खत करावे असे. उपाय सुचवले जातात. पर्यावरण व आर्थिक विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. संपूर्ण शाश्वत विकासासाठी आर्थिक व पर्यावरण विकास दोघांनाही सारखेच महत्व दिले पाहिजे. केवळ आर्थिक नफा मिळवण्यासाठी पर्यावरणाचे नुकसान केले तर तो विकास त्या प्रदेशाला भविष्यात, ओसाड व भकास बनवेल म्हणजेच कोणत्याही ठिकाणी कोणती ही विकासाची योजना राबवताना पर्यावरण संरक्षणाचा विचार केल्याशिवाय ती योजना पूर्ण होऊ शकत नाही. निसर्गकल्याणाशिवाय मानवतेचे कल्याण होऊच शकत नाही.पर्यावरण व विकसावरील जागतिक आयोगाने बूट ईीपव रपव ेिर्शींीं १९८७ अहवाल तयार केला त्यांनी चिरंजीवी किंवा शाश्वत विकासाची संकल्पना मांडली चिरंजीव विकास म्हणजे जो सध्याच्या गरजा पूर्ण करतो व भविष्यकालीन म्हणजेच पुढच्या पिढीच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेमध्ये कोणतीही तडजोड करीत नाही. पुढच्या पिढ्यांसाठी पुरेशा नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करतो. संरक्षण करतो त्या पिढ्यांची काळजी करतो योग्य नियोजनाने वर्तमान व भविष्य काळासाठी निसर्गाच्या समृध्दीकरिता प्रयत्न करतो अशा विकासाला चिरंजीवी किंवा शाधन विकास म्हणतात.पर्यावरणाची काळजी घेणे व त्याचे संरक्षण कूरा ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. फक्त जबाबदारी नाही ही तर गरज आहे.

**– मृणाली महादेव केळकर**
**(विशेष शिक्षिका) के.सी. स्कूल फॉर डेफ.**
**उल्हासनगर, मुंबई**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# महिलेवर पतीसमोरच केला बलात्कार, पुणे पोलिसांनी नराधमाची भरपावसात काढली धिंड





**पुणे/प्रतिनिधी**

एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पतीसमोरच पत्नीवर बलात्कार केल्याची संतापजनक बातमी समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. तर, अमानुष गुन्हा करणाऱ्या या आरोपीला पुणे पोलिसांनी चांगलाच धडा शिकवला आहे. नराधमाची भरपावसात धिंड काढली आहे. पुणे पोलिसांनी दिलेल्या या दणक्याची सध्या शहरात एकच चर्चा आहे. उसने दिलेले पैसे परत न दिल्याने एका नराधमाने पतीला चाकूचा धाक दाखवून त्याच्या समोरच पैसे उसने घेणाऱ्याच्या पत्नीवर बलात्कार केल्याचा धक्कादायक पुण्यातील हडपसर प्रकार परिसरात घडला होता. या गुन्ह्यातील नरधमाची हडपसर परिसरात गुरुवारी भरपावसात पोलिसांनी धिंड काढली. इम्तियाज हशीम शेख (वय ४७, म्हाडा कॉलनी, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी बोपखेल येथील ३४ वर्षीय महिलेने हडपसर पोलिस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली होती. त्यानंतर त्याच्यावर कारवाई करण्यात आली होती. मसाले विक्रेता आरोपी इम्तियाज शेख याने फिर्यादी महिलेच्या पतीस ४० हजार रुपये उसने दिले होते. ते पैसे ते परत करू शकले नाही. त्यामुळे फेब्रुवारी २०२३ मध्ये इम्तियाज याने पतीला जिवे मारण्याची धमकी दिली होती. नंतर त्याने दोघांना तो राहत असलेल्या सुरक्षानगर येथे बोलावून घेतले. तेथे त्याने पतीला समोर बसवून चाकूचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. उसने पैसे परत न केल्याच्या वादातून पतीसमोरच पत्नीवर बलात्कार केला होता. त्यानंतर काही दिवसांनी आरोपीने याच कारणातून तिच्याकडे पुन्हा शरीरसुखाची मागणी केली होती. मात्र यावेळी पीडित महिलेने त्याला नकार दिला. त्यानंतर त्याने त्याच्या घरातील सीसीटीव्हीच्या माध्यमातून झालेले चित्रीकरण पतीला पाठवून व व्हिडीओ सामाजिक माध्यमावर प्रसारित करत बदनामीचा प्रयत्न केला. पीडितेने या प्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर पुणे पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळत भरपावसात शहरात त्याची धिंड काढली आहे. पुणे पोलिसांच्या या कृतीचे स्वागत होत आहे. तर, अशा नराधमांना असेच समाजासमोर आणून त्यांचा चेहरा उघड करावा, असे मतही व्यक्त होत आहे.

# जनसुराज्य शक्ती पार्टीकडून मणिपूरच्या घटनेचा निषेध



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगरमध्ये जनसुराज्य शक्ती पार्टीने माणिपूर येथील घटनेचा तीव्र निषेध केलाये. उल्हासनगर तहसीलदार कार्यलयात निवेदन देऊन आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी निवेदनात केली.

मणिपूर राज्यात गेल्या ४ महिन्यापासून हिंसक घटना घडत आहे. तसेच दोन गटातील वाद विकोपाला गेले आहेत. महिलांवर अत्याचार वाढले असून तिथे महिलांना विवस्त्र करून बलात्कार केल्या जात आहेत. दोन महिलांची नग्न धिंड काढून त्यांची हत्या करण्यात आली.

या अमानवी घटनेचा निषेध करत उल्हासनगरात जनसुराज्य पार्टीने तहसीलदार कार्यलयाला निवेदन दिलंय. घटनेतील दोषी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केलीये. यावेळी जनसुराज्य शक्ती पार्टीचे जिल्हाअध्यक्ष अरविंद घोडेराव, मुकेश बनकर, संजय कुमार सोनकांबळे, अक्षय वाघमारे, शुभम गवई, अविनाश घोडेराव सह पदाधिकारी उपस्थिती होते.

# भिवंडी गुन्हे शाखेने पावणे सहा लाखांचे तब्बल ४२ मोबाईल नागरिकांना केले सुपूर्द



**भिवंडी/अभिजित हिरे**

रस्त्यात जाणाऱ्या पादचाऱ्यांच्या खिशातील मोबाईल चोरी करणे,त्या सोबतच मोबाईल स्नाचींगचे गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढलेले असताना भिवंडी गुन्हे शाखेने अशा चोरीस गेलेल्या गहाळा झालेल्या ५ लाख ७९ हजार रुपये किमतीचे ४२ मोबाईलचा शोध घेऊन नागरिकांना गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोबाईल परत करण्यात आले आहेत. या बाबत माहिती देताना सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश सोनवणे यांनी सांगितले की, चोरीस गेलेले व हरवलेले वेगवेगळ्या कंपन्यांचे मोबाईल चोरीच्या गुन्ह्यांचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यां मध्ये चोरीस गेलेल्या व हरविलेल्या मोबाईल फोनची माहिती संकलित करून, सीईआयआर मोबाईल ॲप प्रणालीचा वापर करून ॲपल, सॅमसंग, व्हीवो, ओप्पो, वन प्लस अशा वेगवेगळ्या कंपन्यांचे एकुण ४२ मोबाईल शोधून काढण्यात यश मिळविले आहे. ते नागरिकांना परत करीत असताना अनेक नागरिकांनी मोबाईल हाती घेतल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. माझा मोबाईल गहाळ झाला होता, तो पुन्हा मला मिळेल ही आशा मी सोडून दिली होती. काही दिवसांनी अचानक भिवंडी गुन्हे शाखेतून मला मोबाईल शोधून काढला असल्याचा फोन आला तो आज माझ्या हाती आहे हा आनंद मला आहे अशी प्रतिक्रिया बालकिशन तिरमदास यांनी देत पोलिसांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले आहे.

### पशुखाद्य कार्यक्रमांतर्गत अनुदानावर मिळणार हायब्रीड, स्वीट ज्वार शुगरग्रेज वैरणीचे बियाणे

लातूर : दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्ध होण्यासाठी सुधारणा कार्यक्रम (सर्वसाधारण योजना), वैरण व पशुखाद्य कार्यक्रम अंतर्गत शंभर टक्के अनुदानावर हायब्रीड, स्वीट ज्वार शुगरग्रेज वैरणीच्या बियाणाचे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून वाटप होणार आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज १० ऑगस्ट २०२३ पर्यंत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील दहाही तालुक्यातून या योजनेसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. या अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपात्रांची माहिती संबंधित पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी किंवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात उपलब्ध आहे. इच्छुकांनी पूर्णपणे भरलेले विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे १० ऑगस्ट २०२३ पर्यंत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यात जमा करावेत.

# नागरिकांना जुन्याच पाण्याच्या टाकीतून पाणीपुरवठा होत असल्याने मनसे आक्रमक



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना जुन्याच पाण्याच्या टाकीतून पाणीपुरवठा होत असून वर्षानुवर्षे पावसाळ्यात गढूळ पाणी पुरविले जात आहे. वाडा नगरपंचायत स्थापण होऊन पाच वर्षे उलटून गेले. नगरपंचायतीच्या नियमानुसार घरपट्टी, पाणीपट्टी, दिवाबत्ती व बाजार कर वाढीव घेतले जात आहेत मात्र पाणी ग्रामपंचायत काळातीलच पुरविले जात आहे. याची दखल घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेना वाडा तालुका शाखेच्या वतीने शुद्ध पाण्याच्या मागणीसाठी गुरुवार दि.२७ जुलै रोजी निवेदन देण्यात आले. वाडा नगरपंचायत स्थापनेपासून ते आजतागायत वाडा शहरातील नागरिकांना अतिशय दुषीत व गढुळ पाणी पुरवठा होत असून यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, नागरिकांना नाहक खाजगी पाणी पुरवठादारांकडून विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. मागील दीड दोन वर्षापुर्वी मोठा गाजावाजा करून वाडा नगरपंचायतीमार्फत पाणी फिल्टरेशन यंत्रणेचे काम सुरू केल्याचे जाहीर करण्यात आले होते मात्र आजतागायत सदर पाणी फिल्टरेशन व्यवस्था कार्यान्वित करण्यात आलेली नाही. याबाबत अनेकदा विचारणा केली असता वाडा नगरपंचायतीकडून थातुरमातूर उत्तरे देवून वेळ मारून नेण्याचे धोरण अवलंबण्यात येत आहे. एकीकडे नगरपंचायत कर्मचाऱ्यांकडून पाणी पटटी वेळेवर भरण्यासाठी नागरिकांना सळो की पळो करून सोडण्यात येते, बॅड बाजा घेवून लोकांच्या घरी जावुन वसुली केली जाते मात्र शहरातील नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात नाही. तरी या पाणी प्रश्नांचे गांर्भिय ओळखून सदर पाणी फिल्टरेशन व्यवस्था त्वरीत कार्यान्वित करून वाडा शहरातील नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना वाडा तालुक्याच्या वतीने कार्यालयाच्या आवारात तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.वाडा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मनोज पष्टे यांना निवेदन देऊन मनसे पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा केली असता येत्या १५ दिवसात फिल्टर प्लांट चालू करून शुद्ध पाणी केला जाईल असे आश्वसन दिले आहे. यावेळी तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे, मधुर म्हात्रे, स्वप्नील मोरे, दीपक ठाकरे, देवेंद्र भानुशाली, जयेश डेंगाने,करण यादव, वैभव किणी आदी मनसैनिक उपस्थित होते.



## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'आय' कार्यालय, वसई**

### जाहिर नोटीस

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मामलत्ता हस्तांतरण करणेकामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे प्रभाग समिती-आय कार्यालयात सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/ तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कागदपत्रासह नोंदवावी. सदर बाबतीत कोणतीही हरकत/तक्रार न आल्यास कार्यालयामार्फत पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | वसई | VV20/4111 | कुलीबाई लक्ष्मीचंद/सविता लक्ष्मीचंद | सविता लक्ष्मीचंद राठोड |
| २. | वसई | VV06/2195 | डॉमणिक सनवेल फरेल | निलेश डॉमणिक फरेल |
| ३. | वसई | VV04/14431 | नानाभाऊ करणकाळ | जलाजा गणप्पा कोटीयण |
| ४. | वसई | VV06/17029 | इग्नेशियस जशिन पिमेंटा | सुनिल जॉन डिसोजा/ शिल्पा सुनिल डिसोजा |
| ५. | वसई | VV03/19967/22 | जेम्स डेव्हलपर्स | डॅनिअल सनी नरोणा |
| ६. | वसई | VV18/1967/2 | संदेश काशिनाथ चुरी | श्रीकांत भिमराव इंगळे/ वैशाली श्रीकांत इंगळे |
| ७. | वसई | VV14/19973/19 | आल्बर्ट फ्रान्सिस फरगोस/लोवी आल्बर्ट फरगोस | सागर सुभाष कोरे/ संस्कृती सागर कोरे |
| ८. | वसई | VV18/15339 | श्रीकृष्ण गजानन मायदेव/उज्वला श्रीकृष्ण मायदेव | सुमन तुकाराम पाटील / राजेश्री आनंद मराठे |
| ९. | वसई | VV05/3619 | अनिल दशरथ चौधरी | रोहित गणपती गुरव |
| १०. | वसई | VV17/8796 | रुकिया महमद साले जिग्रु | शाहिस्ता मुनाफ जिगरू |
| ११. | वसई | VV06/11774 | शंकर सखाराम सावर (भो) | अमित शंकर सावर |
| १२. | वसई | VV07/13804 | मिक्सी एलडेर डिपेना | दिपीका देवेंद्र चौधरी |
| १३. | वसई | VV18/5357 | शिला पिटर डिसोजा | मॅकवेल डिकुना |
| १४ | गिरीज | GR03/230 | सुलभा गजानन चौधरी | हिना हेमंत पाटील |
| १५. | गिरीज | GR01/207 | जॉर्जसन जॉन डिसोजा | बिजॉय अलायलो व स्नेहा अलायलो |
| १६. | सांडोर | SD01/264/19 | सतिष ज. दत्तानी | भोजा चीन्नपा पुजारी/ मालती बी पुजारी |
| १७. | सांडोर | SD01/264/78 | सतिष ज. दत्तानी | रेखा समीर सनिल/ समीर भास्कर सनिल |
| १८. | सांडोर | SD01/264/67 | सतिष ज. दत्तानी | निलेश यशवंत काटकर |
| १९. | सांडोर | SD02/817 | सजनलाल श्रीनाथ गुप्ता | प्रकाशचंद सजनलाल गुप्ता |
| २०. | गिरीज | GR01/14 | पास्काल फ्रान्सिस परेरा/ प्रविण पास्काल परेरा | प्रविण पास्काल परेरा |
| २१. | गिरीज | GR03/122/1 | फ्रान्सिस थॉमस कुलास | विलास फ्रान्सिस कोलास |
| २२. | गिरीज | GR02/62 | प्रभाकर नानाभाई राऊत | वासंती प्रभाकर राऊत |

जा.क्र. : वविशम/कर विभाग/वसई/२४४७/२०२३-२४
दिनांक : २५/०७/२०२३

सही/-
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'आय'
वसई-विरार शहर महानगरपालिका


# डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नेहरोली ग्रामपंचायत व आरोग्य विभागाचा उपक्रम



**वाडा/प्रतिनिधी**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या विविध आजार व साथ रोगांना रोखण्यासाठी नेहरोली ग्रामपंचायत व नेहरोली आरोग्य उपकेंद्राच्या वतीने नेहरोली ग्रामपंचायत हद्दीत जनजागृती करून स्वच्छता करण्यात आली व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. पावसाळ्यात एक आठवड्यापेक्षा जास्त दिवस साठवून ठेवलेल्या पाण्यात, तुंबून राहिलेल्या गटारी, साठलेले डोह, खड्डा, घराच्या शेजारी पडलेल्या टाकावू वस्तूंमध्ये साठलेले पाणी या मध्ये डासांची पैदास होते. ते टाळण्यासाठी नेहरोली ग्रामपंचायतीच्या सरपंच संजना गिंभल, उपसरपंच प्रथमेश ठाकरे, सदस्य प्रकाश रायत, आरोग्य सेविका सीमा लहांगे व आरोग्य उपकेंद्राच्या गटप्रवर्तक स्वाती जाधव व आशा वर्कर अश्विनी हांडेकर, सुजाता जाधव यांनी गावात स्वच्छता मोहीम राबवत गटारी, नाले स्वछ केली तर अनेक दिवसांपासून पाणी साठवलेले ड्रम, पिंप, टाक्या, हौद, रांजण इत्यादी रिकामे करून स्वछ करून आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन नागरिकांना केले.

# अंगठ्यांचे ठसे वापरुन बँकेतून ग्राहकांची पैसे लंपास

## चाळीसगावच्या सायबर गुन्हेगारांकडून तीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नाशिक/प्रतिनिधी**

एएफपीएस अर्थात आधार इनेबल पेमेंट सिस्टीमच्या माध्यमातून अंगठ्यांचे ठसे वापरुन बँकेतून ग्राहकाच्या संमतीविना परस्पर पैसे काढून घेणाऱ्या चाळीसगव तालुक्यातील तिघांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. नाशिक ग्रामीण सायबर पोलिस स्टेशनला याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक जिल्ह्याच्या नांदगाव तालुक्यातील पळाशी येथील समाधान संजय घुगे यांचे बेहळगाव येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत खाते आहे. या खात्यातून २ लाख ६६ हजार ७९९ एवढी रक्कम त्यांच्या अंगठ्याच्या ठशांचा वापर करुन परस्पर अज्ञातांकडून काढून घेण्यात आली होती.

याप्रकरणी नाशिक सायबर पोलिस स्टेशनला गु.र.न. ८/२३ भा.द.वि. ४२०, सह आयटी ॲक्ट ६६ क, ६६ड नुसार अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक ग्रामीण सायबर गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी तांत्रिकदृष्ट्या केलेल्या तपासादरम्यान किशोर लक्ष्मण सोनवणे (रा. उपखेडा, ता. चाळीसगांव, जि. जळगांव), रविंद्र विजय गोपाळ (रा. बानगांव, ता. चाळीसगांव जि. जळगांव आणि सोमनाथ काकासाहेब भोंगाळ (रा. बाणगांव, ता. चाळीसगांव जि. जळगांव) यांची नावे निष्पन्न झाली. त्यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने तिघांना तिन दिवस पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान तिघांकडून त्यांनी गुन्हयात वापरलेले चार मोबाईल, चार लॅपटॉप, चार बायोमॅट्रीक फिंगर स्कॅनर, एक आयरीस मशिन, एक फेस कॅमेरा तसेच फसवणूकीच्या रकमेतून खरेदी केलेल्या दोन टीव्हीएस कंपनीच्या रेडर मोटर सायकली असा एकुण २ लाख ८३ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पो.नि. सत्यजित आमले व त्यांच्या पथकाने या तपासकामी सहभाग घेतला.

अटकेतील आरोपींनी जानेवारी २०२३ मधे नांदगाव तालुक्यातील पळाशी व वेहेळगाव येथे आधारकार्ड अपडेशन कॅम्प घेतला होता. या कॅम्पमध्ये बायोमॅट्रीक फिंगर स्कॅनरव्दारे उपस्थित नागरीकांच्या अंगठयांच्या ठशांचा डाटा संकलीत केला होता. आरोपींनी CSC Digipay ऑनलाईन मनी ट्रान्सफर सर्व्हिस ॲपमध्ये नागरीकांच्या ठशांचा वापर करुन बँक खात्यांवरून परस्पर पैसे काढून घेतले होते.

31 JULY TO 06 AUGUST 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 7/29/2023 9:24 PM Page 1



## पान १ वरून....

### तणावाखाली पोलीस अधिकाऱ्याची मती ...

हत्या करुन स्वतःला संपवलं आहे. हा सगळा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. अमरावती पोलीस दलात कार्यरत असलेल्या या पोलीस अधिकाऱ्याने पत्नी आणि पुतण्याची गोळ्या झाडून हत्या केल्यानंतर स्वतःही आत्महत्या केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरु केला आहे. अमरावती पोलीस दलातील सहाय्यक पोलीस आयुक्त भारत गायकवाड यांनी पुण्यात राहणाऱ्या पत्नीचा आणि पुतण्याचा गोळी झाडून खून केला आहे. खुनानंतर भरत गायकवाड यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्याही केली. मध्यरात्री चार वाजण्याच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. स्थानिक पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत आहे. पत्नी मोनी गायकवाड (वय ४४), पुतण्या दीपक गायकवाड (वय ३५) अशी गोळी झाडून खून केलेल्या दोघांची नावे आहेत. तर भारत गायकवाड यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली आहे. घटनेची माहिती मिळताच चतुःशृंगी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.भारत गायकवाड हे अमरावती पोलीस दलात सहायक आयुक्त म्हणून कार्यरत होते. तर त्यांचे कुटुंबीय पुण्यात वास्तव्याला होते. लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक नळातून पाणी भरण्याच्या वादातून शेजाऱ्यांनी मारहाण केल्यामुळे एका २५ वर्षीय महिलेने तिचे तीन महिन्यांचे बाळ गमावलं आहे. वाघोली येथील गायरान गोरेवस्ती येथील पीडित महिला सकाळी सात वाजता घराजवळील सार्वजनिक नळावरून पाणी आणण्यासाठी रांगेत उभी असताना ही घटना घडली. महिलेचा नंबर आल्यानंतर पीडितेने तिची बादली नळाखाली ठेवली आणि पाणी भरायला सुरुवात केली. पण तिचा शेजारी रोहित रवी धोत्रे हा अचानक आला आणि तिची बादली काढून नळाखाली त्याची बादली ठेवली. यावरून पीडित महिला आणि धोत्रे यांच्यात बाचाबाची झाली. यादरम्यान धोत्रेचे वडील आणि आई शांताबाई घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी पीडितेला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने धोत्रे याने पीडितेला चापट मारली आणि तिच्या पोटावर लाथ मारली. पोटात प्रचंड दुखू लागल्याने पीडित महिला खाली पडली. त्यानंतर रात्री तिच्या गर्भाशयातून रक्त येऊ लागले. तिच्या पतीने तिला जवळच्या हॉस्पिटलमध्ये नेले तेथून तिला ससून रुग्णालयात हलवण्यात आले. जखमांमुळे तिचा गर्भ नष्ट झाल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले.

### संसाराला ग्रहण लावी अनैतिक ...

जोडीदाराला सुख, आनंद व समाधान दिले तरच वैवाहिक जोडीदाराकडून आपल्याला पण सुख, आनंद व समाधान मिळते. या जगात संसार हाच एकमेव असा व्यवहार आहे की, ज्यामध्ये तुम्ही आपल्या वैवाहिक जोडीदाराला जेवढे सुख समाधान व आनंद द्याल त्यापेक्षा दुप्पट सुख समाधान व आनंद आपल्या जोडीदाराकडून परत मिळते. संसार आणी पती व पत्नी यांच्यातील संबंधाबाबत सुप्रसिद्ध मराठी लेखक व पु काळे यांनी ज्या साध्या सोप्या पद्धतीने सांगीतलेले आहे तसे इतर कोणत्याच भाषेतील लेखकाला सांगता व समजवता आलेले नाही. त्यांच्या मतेपतिपत्नीचं स्त्री-पुरुषाचं नातं, हे एक वेगळंच-तंत्र आहे. त्यात आकर्षण आहे, विकर्षण आहे. ओढ असते, चीडही येते. निमंत्रण असतं, अस्वीकारही असतो. स्वावलंबन मागणारं परावलंबित्व असतं. स्त्री-पुरुष नात्यातला हा एक मधुर तणाव असतो. म्हणूनच त्यांच्यातला विरोध टिकला पाह्यजे. बाईचं पुरुषीकरण होता कामा नये. निसर्गाच्या निर्मितीला तोड नाही. त्यानं स्त्री आणि पुरुष सवंगडी म्हणून निर्माण केले. अनमोल नजराणा दिला. हा भाव मनात ठेवून दोघांनी एकमेकांना 'ठेव' म्हणून जपलं, तर स्वर्ग इथंच उतरतो.दुर्दैवाने व पु काळे यांचे विचार मराठी भाषेपुरतेच मर्यादित राहिलेले आहेत. इतर भाषांमध्ये भाषांतरीत झालेले नाहीत. बहुधा सचिन आणि अरुणा या दोघांचे वपु च्या वक्त्यांकडे दुलक्ष झाले असावे. लग्नाच्या काहीच वर्षात सचिन आणि अरुणा या दोघांत खटके उडू लागले. त्यातच पत्नी अरुणा हिचे ऋषिकेश नामदेव तुपे (२४) या तरुणासोबत सूत जुळले.ऋषिकेश हा अरुणाचा दूरचा नातेवाईक होता.त्यामुळे सचिनला या विवाहबाह्य संबंध बदल माहिती नव्हती. अरुणा पती असताना ऋषिकेश सोबत मौजमजा करू लागली. त्यामुळे सचिन अरुणाला मारझोड करू लागला. ही गोष्ट तिने आपल्या प्रियकर मित्र ऋषिकेश तुपे याला सांगितली. ऋषिकेशने त्या दोघांच्या प्रेम संबंधात अडथळा ठरत असलेल्या सचिन मुरबे या तरुणाची हत्या करण्याचा कट रटला. या कटाची कोणाला ही कल्पना येणार नाही अशा पद्धतीने बेत आखला. ऋषिकेशने सचिनला सांगितले की, आपण दोघे जगलात शिकारी जाऊया. सचिन म्हटला ठीक आहे. जाऊ शिकारीला. पण त्याला शिकारीला जाताना आपलीच शिकार होणार हे माहिती नव्हतं. तो साधा आणि सरळ मनुष्य होता.एकदा शब्द दिला की तो दिला.ऋषिकेश हा गावातील आणि अरुणाला नातेवाईक असल्याने तो त्याच्या सोबत जाण्यासाठी तयार झाला.इकडे अरुणा मनातून खुश झाली होती.कारण तिचा हेतू साध्य होणार होता. शिकारीच्या बहाण्याने तिच्या पतीची शिकार होणार आणि त्यानंतर ऋषीकेश सोबत मौजमजा करायला मोकळी, असे तिला वाटले असावे पण नियती चे फासे कधी पळतील हे सांगता येत नाही. ती आज ज्या क्षणिक सुखासाठी हपापली होती,त्या पायी तिच्या सुखी कुटंबाची राखरांगोळी होणार होती .पण तिने तो विचारच केला नाही. अखेर तो दुर्दैवी दिवस उजळला. दिनांक १५ जुलै रोजी रात्री ९.३० च्या सुमारास ऋषीकेश सचिन मुरबे याला शिकारीच्या बहाण्याने देवपाडा गावाच्या हद्दीतील आरीच्या जंगल भागात घेऊन गेला. रात्रीचा वेळ असल्याने जंगल किर वाजत होते. सगळीकडे काळोख पसरला होता. हीच संधी साधून ऋषिकेशने शिकारीसाठी घेतलेल्या ठासणीच्या बंदुकीने सचिनच्या डोक्यात गोळी झाडली. यात तो जागीच कोसळून तडफत मरण पावला.त्यानंतर ऋषिकेश याने सचिनच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला. आधीच सगळी तयारी करून ठेवलेल्या ऋषिकेशने जंगलातील एका खड्यात सचिनचा मृतदेह पुरला. कोणाला संशय येऊ नये यासाठी त्या जागेवर पालापाचोळा गोळा करून टाकून दिला. आणि तो अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळवरून निघून गेला. दुसऱ्या दिवशी सचिन दत्तू मुरबे हा तरुण १६ जुलै रोजी घरातून हरवला असल्याची तक्रार त्याची पत्नी अरुणा मुरबे हीने नेरळ पोलीस ठाण्यात केली होती .त्यावेळी तिच्या सोबत ऋषिकेश तुपे हा सुद्धा होता. नेरळचे सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी सचिन बेपत्ता झाल्याची तक्रार लिहून घेतली. नेरळ पोलिसांनी दोघांची तक्रार दाखल करुन तपास सुरु केला. तिकडे मुरबे यांच्या कुटुंबियांनी आपल्या मुलाचा घातपात झाला असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले होते. त्यामुळे पोलिसांनी त्या दृष्टीने तपास सुरु केला होता. नेरळ गुन्हे प्रकाटीकरण विभागाचे पथकाने देवपाडा गावात सर्व सोर्स वापरले आणि सचिन मुरबे हा हरवला असला तरी त्यामागे घातपात असल्याचे आढळून आले होते. अरुणा मुरबे आणि तिचा दूरचा नातेवाईक ऋषिकेश तुपे हे दोघे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी आले असता ते दोघेही घाबरलेले दिसत होते.तसेच त्यांच्या बोलण्यातही विसंगती दिसत होती. त्यामुळे पोलिसांना दोघांच्या बोलण्यावर संशय आला. पोलिसांनी या प्रकरणात खोलात जाऊन चौकशी केली. या प्रकरणाचा तपास करत असताना हवालदार प्रवीण लोखंडे यांना गुप्त माहितीदारांकडून माहिती मिळाली की, ऋषिकेश आणि सचिन देवपाडा गावातील आरी जंगलात शिकारीसाठी गेले होते, त्यानंतर सचिन बेपत्ता झाला. प्रकरण गुंतागुंतीचे दिसत असल्याने पोलिसांनी ऋषिकेशला पोलिस ठाण्यात बोलवून घेतले. त्याची कसून चौकशी केली. पण तो काही खरे बोलत नव्हता. अखेर पोलिसांनी हिसका दाखवताच तो पोपटासारखा बोलू लागला. सचिनची पत्नी अरुणा हिच्या सोबत माझे विवाहबाह्य सबंध असल्याने आमच्या मार्गातील अडसर दूर करण्यासाठी अरुणा आणि मी सचिनचा खून करण्याचा बेत आखला. आणि ठरल्या प्रमाणे मी १५ जुलै रोजी रात्री साडेनउच्या सुमारास देवपाडा गावाच्या हद्दीतील आरीच्या जंगल भागात सचिनला शिकारीच्या बहाण्याने घेऊन गेलो. त्यानंत जंगलात आत गेल्यानंतर शिकारीसाठी घेतलेल्या ठासणीच्या बंदुकीने सचिनच्या डोक्यात गोळी झाडली. त्यानंतर त्याचा मृतदेह जंगलातच पुरला. अशी धक्कादायक कबुली दिल्याने नेरळ पोलिसांनी ऋषिकेश तुपे याला अटक करण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी कर्जतच्या दंडाधिकारी यांच्या उपस्थितीत जंगलात जाऊन पुरलेल्या अवस्थेत असलेल्या मृतदेहाला बाहेर काढले. सचिनचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत असल्यामुळं मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. आरोपी ऋषिकेश आणि अरुणा या दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल करून ऋषिकेश नामदेव तुपे (२४) आणि अरुणा सचिन मुरबे (३६) या दोघांना २१ जुलै रोजी अटक करण्यात आली आहे. ही कामगिरी जिल्हा पोलीस उप अधीक्षक विजय लगारे, पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे, शिवाजी ढवळे इत्यादींनी पार पाडली.

### चारित्र्याच्या संशयामुळे संसाराची माती...

वागण्या-बोलण्यात झालेला फरक प्रतिक्षाला दिसू लागला, तेंव्हा तिने त्याला बोलते करून या वागण्याचे कारण विचारण्याचा प्रयत्न केला, पण त्याने सरळ उत्तर न देता तिचा उपमर्द केला. तिला काय करावे हेच सुचत नव्हते. आपली काही चूक झाली आहे का हे समजण्याचाही काही मार्ग नव्हता. तिच्यादृष्टीने सारे काही व्यवस्थितच होते. मग तो आपल्याशी असे का वागतो, प्रेम करणाऱ्या पतीचे प्रेम अचानक कसे काय संपले याचा काही तिला उलगडा होत नव्हता. तिने नाते सावरण्याचा खूप प्रयत्न केला, पण तो काही सावरण्याच्या मानसिकतेत नव्हता. तिचाही इलाज चालेना, दोघातील मतभेद वाढत गेले. जितेंद्र अणि प्रतिक्षा यांच्यामध्ये सुरू असलेला हा रूसवा-फुगवा नातेवाईकांच्याही लक्षात यायला वेळ झाला नाही. शेजारी-पाजारीही या दोघांकडे वेगळ्या नजरेने पाहू लागले. सुरुवातीला असलेला अबोला आणि नंतर वादावादी यामुळे घरातले वातावरण बिघडून गेले. याचा परिणाम मुलांच्या हसण्या- बागडण्यावरही होवू लागला. सकाळ- संध्याकाळ नवरा- बायकोमध्ये खटके उडू लागले. हा आवाज बाहेर न जावू देण्याची खबरदारी ते घेत असत, पण आता त्यालाही धरबंद उरला नाही. वाद करतांनाही कुणाचं सोयरसुतक ते ठेवत नसत. सुरूवातीला नवरा-बायकोचा चढलेला आवाज ऐकला की शेजारी-पाजारी आपुलकीने वाद मिटवायला येत असत, पण आता त्यांनीही दुर्लक्ष करायला सुरूवात केली. सुरूवातीला हे दोघे वाद करतांना एकमेकांचा अपमान करायचे, हातवारे करून डिवचायचे, पण आता ते एकमेकांच्या अंगावरही धावून जात असल्याची चर्चा ऐकायला मिळू लागल्याने जितेंद्रचे नातेवाईक चिंतेत होते. सुरुवातीला जितेंद्र आणि त्याची बायको प्रतिक्षा उर्फ टीना यांच्यातील भांडणाचे कारण कुणाला कळत नव्हते, पण आता जितेंद्र प्रतिक्षाला भांडणात तिच्या चारित्र्यावरून बोलायला लागला होता. स्त्री सर्व आरोप सहन करते नवऱ्याचा प्रसंगी मारही सहन करते, पण चारित्र्यावर कुणी शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न केला की ती भयंकर चिडते. प्रतिक्षाचं असंच काहीसं झालं. बाद-विवाद झाला की ती जितेंद्रवर तुटून पडायची. आपली बायको आपल्या अंगावर धावून येते याचं शल्य त्याला बोचू लागलं. तिच्याबद्दलचा द्वेष वाढू लागला. प्रतिक्षाही जितेंद्रबाबत खाऊ की गिळू असे करायची. गुरुवात दि. ६ जुलै २०२३ चा तो दिवस, त्यादिवशी सकष्टी चतुर्थी असल्यामुळे कुंडाणे - बेल्हाणे गावातील श्रद्धाळू लोक गणपतीच्या दर्शनासाठी बाहेर पडत होते. सकाळी सातच्या दरम्यान जितेंद्रच्या भावाचे दोन गबगीने जितेंद्रच्या घरासमोर येवून उभे राहिले. त्याच्या घराचा दरवाजा आतून बंद होता. बाहेरून घरात शांतता दिसत होती. त्या दोघांनी घराशेजारील लोकांना बोलावून जितेंद्रला घर उघडण्यास सांगण्याची विनंती केली, त्यानुसार शेजा-यांनी हाका मारण्यास सुरुवात केली असता त्यांना आतून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. एव्हाना परिसरातील लोक मोठ्या संख्येने त्याठिकाणी जमू लागले. आत्तापर्यंत भावाचे ते दोन मित्र शांत होते, पण प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही जितेंद्र व त्याची पत्नी प्रतिक्षा प्रतिसाद देत नाही म्हणताच त्यांनी तोंड उघडले. जितेंद्रने त्याच्या भावाला मी आत्महत्या करत आहे' असा फोन केला होता, त्यामुळे भावाने आपल्या मित्रांना फोन करून जितेंद्रच्या घरी जायला सांगितले, जितेंद्रला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करण्याची विनंती केली होती, म्हणून ते दोघे मित्र धावून आले होते. ही माहिती त्यांनी सांगताच शेजारी-पाजारीही हबकले. शेजाऱ्या पाजाऱ्यांना, जमलेल्या लोकांना हे समजताच त्यांनी गावातील पोलीस पाटीलांना बोलावले. त्यांनी खात्री करून धुळे तालुका पोलीस स्टेशनला तशी खबर दिली, त्यानुसार धुळे तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक ताटी कोडीलवार उपनिरीक्षक ज्ञानदेव काळे यांच्यासह घटनास्थळी आले. तेथे जमलेल्या लोकांकडून घटना जाणून घेत गावक-यांच्या मदतीने जितेंद्रच्या घराचा दरवाजा तोडला आणि त्यांनी घरात प्रवेश केला. आत प्रवेश करताच स्वयंपाक घरातील स्लॅबच्या लोखंडी कड्यांना प्रतिक्षा आणि जितेंद्र यांचे गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आले. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी एस. आर. सोनावणे हेसुद्धा घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलिसांनी पंचनाम्याचे सोपस्कार पार करत दोन्ही मृतदेह विच्छेदनकामी शासकीय रुग्णालयात रवाना केले. जितेंद्र आणि प्रतिक्षा यांच्या आत्महत्येचे कारण गुलदस्त्यात असतांना त्या दोघांवर आत्महत्या केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी एस. आर. सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली जितेंद्र वाळू सोनावणे-पाटील आणि प्रतिक्षा जितेंद्र सोनावणे-पाटील यांना आत्महत्या करण्यास कुणी प्रवृत्त केले याचा तपास करण्यासाठी उपनिरक्षिक ज्ञानदेव काळे यांच्याकडे तपास सोपवण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव काळे यांच्या नेतृत्वाखाली तपासाची चक्रे फिरत असतांना तपास पथकाला एक सुसाईड नोट आढळून आली. त्यामध्ये लिहिले होते की माझ्या पत्नीचे माझ्या लहान भावाशी अनैतिक संबंध असल्याचे निष्पन्न झाल्याने मी तिचा गळा आवळून खून केला, त्याचे प्रायश्चित म्हणून मीसुद्धा माझी इहलोकीची यात्रा येथेच संपवत आहे. गळफास घेवून मी आत्महत्या करत आहे. या सुसाईड नोटने घटनेवर आपसूक प्रकाश पडल्याने धुळे तालुका पोलीस स्टेशनला कैलास शामराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीच्या आधारे मयत जितेंद्र याच्याविरुद्ध प्रतिक्षाचा खून केल्याचा आणि स्वतः आत्महत्या करून घेतल्याचा गुन्हा दाखल झाला.

### लंपटगिरीचा नाद त्याच्या प्राणावर...

छेडखानी करत असे. मोबाईलवर बोलण्याचा बहाणा करत तो प्रमोदच्या घराजवळ येत होता. प्रमोदच्या घराजवळ आल्यानंतर तो प्रमोदच्या पत्नीकडे बघून तिला हळूच बारीक खडे फेकून मारायचा. आपल्याकडे लक्ष वेधून अश्लिल हातवारे करत मोबाईलवर बोलण्याचा तो तिला इशारा करत असे. तिने दुर्लक्ष केले तरी देखील आशिष तिला बघून एक डोळा मिचकावून तिचे लक्ष आपल्याकडे पुन्हा पुन्हा वेधण्याचा प्रयत्न करत होता. आशिषच्या या नेहमीच्या प्रकाराला प्रमोदची पत्नी वैतागली. अखेर एके दिवशी तिने हा प्रकार पती प्रमोदच्या कानावर घातला. त्यामुळे प्रमोदने आशिषला भेटून त्याला हा फाजीलपणा बंद करण्याची सुचना दिली. माझ्या पत्नीचे यापुढे नाव घेवू नको असे प्रमोदने आशिष यास स्पष्टपणे बजावले. प्रमोदचा रुद्रावतार आणि प्रसंगाचे भान ठेवत आशिषने माघार घेत मी यापुढे तुझ्या पत्नीचे नाव घेणार नाही असे म्हणत आपली सुटका करुन घेतली. सुरुवातीला काही दिवस आशिष शिरसाळे याने प्रमोदच्या पत्नीची अजिबात छेडखानी केली नाही. त्यामुळे प्रमोद आणि त्याची पत्नी या दोघांना मानसिक दिलासा मिळाला. मात्र जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही या म्हणीप्रमाणे आशिषला प्रमोदच्या पत्नीची छेडखानी करण्याची पुन्हा लहर आली. पुन्हा त्याने तिला बारीक खडे मारुन, एक डोळा मिचकावून, मोबाईलवर बोलण्याचा इशारा करण्याचे प्रकार सुरु केले. हा प्रकार प्रमोदला त्याच्या पत्नीने कथन केला. मात्र दरम्यानच्या कालावधीत सणानिमीत्त प्रमोदची पत्नी मुलांना घेवून एक महिन्यासाठी माहेरी गेली. एक महिन्यानंतर प्रमोदने त्याच्या पत्नीला तिच्या माहेरुन पुन्हा घरी आणले. प्रमोदची पत्नी पुन्हा घरी आल्याचे बघून आशिषचे मन अस्वस्थ झाले. त्याने पुन्हा प्रमोदच्या पत्नीकडे वाईट नजर टाकण्यास सुरुवात केली. त्याने पुन्हा तिची छेडखानी सुरु केली. हा प्रकार प्रमोदला त्याच्या पत्नीने सांगितला. त्यामुळे प्रमोदच्या रागाचा पारा चढला. २३ जून २०२३ रोजी रात्री सव्वा नऊ वाजेच्या सुमारास प्रमोद त्याच्या घराबाहेर उभा होता. त्याचवेळी त्याची नजर आशिषवर पडली. त्यावेळी आशिष शिरसाळे हा गिरणा नदी पात्रात शौचालयासाठी जात होता. आशिष एकटा असल्याचे बघून त्याला ठार करण्याची ही नामी संधी असल्याचा कुविचार प्रमोदच्या मनात चमकून गेला. त्यामुळे प्रमोदने जास्त वेळ न घालवता दोन फुट लांबीचा लोखंडी रॉड हाती घेतला. आता हिच वेळ आहे आशिषला संपवण्याची असे मनाशी म्हणत प्रमोद त्याच्या मागेमागे गिरणा नदीपात्रात गेला. गिरणा नदी पात्रात त्यावेळी अंधार होता. अंधारात दोघांशिवाय कुणीही नव्हते. हिच संधी साधून त्याला ठार करण्यासाठी प्रमोद सज्ज झाला. आशिष शौचास बसला असतांनाच प्रमोद त्याच्या समोर जावून उभा राहिला. तु माझ्या पत्नीची छेडखानी का करतो असा खडा सवाल प्रमोदने आशिषला केला. तुला वारंवार समजावून देखील तुला समजत नाही का असे प्रमोद त्याला रागाने म्हणाला. प्रमोदचा राग बघून आशिषला देखील राग आला. तुझ्याकडून जे होईल ते करुन घे असे आशिषने रागाच्या भरात प्रमोदला म्हटले. शब्दामागे शब्द वाढल्यामुळे प्रमोदला राग आला. संतापाच्या भरात प्रमोदने सोबत आणलेल्या दोन फुट लांबीच्या लोखंडी रॉडने आशिषवर हल्ला केला. लोखंडी रॉडचा वार चुकवण्यासाठी आशिष खाली बसला. आशिष खाली बसल्यामुळे लोखंडी रॉडचा वार त्याच्या डोक्यावर बसला. लोखंडी रॉडच्या हल्लयात आशिष रक्तबंबाळ झाला. तशाही परिस्थितीत आशिषने प्रमोदला मारण्याचा प्रयत्न केला. मात्र डोक्यातून रक्त निघत असल्याने त्याचा प्रतिकार कमी पडला. वेदना वाढत गेल्यामुळे रक्तबंबाळ आशिष हातपाय झटकू लागला. आशिष रक्तबंबाळ झाल्याचे बघून प्रमोद मनातून घाबरला. घरी गेल्यावर आशिष आपले नाव सांगेल ही भिती प्रमोदला सतावू लागली. आता आशिषला कायमचे संपवण्याचा निर्धार प्रमोदने मनाशी पक्का केला. त्यामुळे त्याने अजून तिन ते चार वार आशिषच्या डोक्यावर केले. या हल्लयात आशिष जमीनीवर कोसळून त्याची हालचाल बंद झाली. त्याची हालचाल बंद झाल्याने तो मरण पावल्याची प्रमोदची खात्री झाली. त्याला तशाच अवस्थेत सोडून हातातील लोखंडी रॉड नदी पात्रात फेकून प्रमोद निघू लागला. त्याचवेळी आशिषचा मोबाईल वाजू लागला. प्रमोदने तो मोबाईल दगडाने फोडून गिरणा नदी पात्रात फेकून दिला. घाबरलेला प्रमोद तशाच अवस्थेत मागच्या दाराने गुपचूप घरी आला. दोरीवर वाळत घातलेले कपडे त्याने सोबत घेत मोटार सायकलने एका निर्जन जागी आला. उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाकडे जाणा-या रस्त्याच्या अलिकडे एका निर्जन जागी मोटार सायकल थांबवून त्याने अंगावरील कपडे काढले. सोबत आणलेले कपडे त्याने तेथेच परिधान केले. बदललेले कपडे सोबत घेत त्याने परिसरातील हॉटेल कुबेर गाठली. या हॉटेलच्या परिसरात वापरात नसलेल्या एका शौचालयात त्याने ते कपडे लपवून दिले. त्यानंतर जणू काही झालेच नाही अशा आवेशात तो हॉटेल कुबेर मधे आला. त्याठिकाणी बांभोरी गावचे महसुल मंडल अधिकारी अमोल पाटील हे मद्यपान करत असल्याचे त्याला दिसले. प्रमोदने देखील हॉटेलमधून मद्याची एक बाटली विकत घेत त्यांच्यासोबत मद्य पिण्यास सुरुवात केली. दोघे एकमेकांना परिचीत असल्यामुळे दोघे एकाच टेबलवर बसून मद्यपानाचा आस्वाद घेत होते. दरम्यान एका कामानिमीत्त एरंडोल येथे सोबत जावू असे मंडल अधिकारी अमोल पाटील हे प्रमोद यास म्हणाले. प्रमोद यास कुठेतरी वेळ घालवायचा असल्यामुळे तो मंडल अधिकारी अमोल पाटील यांच्यासोबत जाण्यास लागलीच तयार झाला. अमोल पाटील यांच्यावर मोठ्या प्रमाणात दारुचा अंमल झाला होता. त्यामुळे प्रमोदने कार चालवण्यास घेतली. अमोल पाटील आणि प्रमोद नन्नवरे हे दोघेजण कारने एरंडोलच्या दिशेने निघाले. दरम्यान आपल्या हातून बांभोरी गावातील आशिष शिरसाळे या तरुणाचा खून झाला असल्याची माहिती प्रमोदने मंडल अधिकारी अमोल पाटील यांना सांगितली नाही. एरंडोल येथे एका हॉटेलजवळ अमोल पाटील यांनी प्रमोद यास कार उभी करण्यास सांगितले. हॉटेलमधे अमोल पाटील एकटेच जावून थोड्यावेळाने परत आले. आता आपण परतीचा प्रवास करु असे प्रमोदने मनाशी गृहीत धरले होते. मात्र आपण श्रीशैलम हैद्राबाद येथे ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेवून येवू असे अमोल पाटील हे प्रमोद नन्नवरे यास म्हणाले. त्यामुळे प्रमोदचा नाईलाज झाला. प्रमोद नन्नवरे आणि अमोल पाटील असे दोघे जण कारने पुढच्या प्रवासाला निघाले. दरम्यान गिरणा नदीपात्रात शौचालयास गेलेला आशिष रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याचे काही लोकांच्या पाहण्यात आले. या घटनेची माहिती गावात वा-यासारखी पसरली. त्यामुळे आशिषचे वडील प्रकाश शिरसाळे यांनी नातेवाईकांना सोबत घेत गिरणा नदीचे पात्र गाठले. त्याठिकाणी त्यांना आशिषचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह आढळला. या घटनेची माहिती पाळधी दुरक्षेत्र येथे देण्यात आली. माहिती मिळताच धरणगाव पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक उद्धव डमाळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किसनराव नजनपाटील तसेच पाळधी ओपीचे सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद कठोरे आदींनी आपल्या सहका-यांसह घटनास्थळ गाठले. उप विभागीय अधिकारी कृषिकेश रावले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपासाला सुरुवात करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किसनराव नजनपाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी या घटनेचा समांतर तपास सुरु केला. या घटने प्रकरणी मयत आशिष शिरसाळे याचे वडील प्रकाश आनंदा शिरसाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात मारेक-याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. २०४ भा.द.वि. ३०२ नुसार हा गुन्हा धरणगाव पोलिस स्टेशनला नोंद करण्यात आला. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किसनराव नजनपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रातोरात या गुन्ह्याच्या समांतर तपासाला सुरुवात करण्यात आली. खून झालेल्या तरुण हा विस ते पंचवीस वयोगटातील होता. त्याचा खून कुणी व का केला असेल याचा गावात फिरुन कानोसा घेण्यात आला. काही खबरे देखील कामाला लावण्यात आले. याशिवाय आजुबाजुला काही पुरावे मिळतात का याचा शोध घेण्यात आला. मयताची पार्श्वभुमी पाहिली असता तो एक साधारण मजुर होता. त्याचे काही उधारीचे वाद होते का? त्याचे काही अनैतिक संबंध होते का याचा देखील तपास करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सर्व परिसर पिंजून काढत माहिती संकलीत करण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. साधारण दोन आठवड्यांपुर्वी बांभोरी गावातील प्रमोद भिमराव नन्नवरे या विवाहीत तरुणाने मयत आशिष शिरसाळे याला धमकी दिली होती. दोघांचा मोठ्याने वाद झाला होता अशी एक महत्वाची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. या माहितीचा धागा पकडून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सक्रीय झाले. मयत आशिष आणि प्रमोद या दोघांचे घर गावात जवळ जवळ असल्याची देखील माहिती चौकशीत पुढे आली. मिळालेल्या माहितीची पडताळणी केली असता प्रमोद नन्नवरे हा घरी नसल्याची माहिती देखील पुढे आली. दरम्यान गावात सर्वत्र सतत पाऊस सुरु होता. त्यामुळे या पावसात प्रमोद कुठे गेला असेल यादृष्टीने तपास करण्यात आला. प्रमोद नन्नवरे याला दारु पिण्याचे व्यसन असल्याचे तपास पथकाला समजले. तो मद्यपान करण्यासाठी नजीकच्या कुबेर हॉटेलमधे नेहमी जात असल्याची माहिती पथकाला समजली. त्या माहितीच्या आधारे पथकाने हॉटेल कुबेर गाठले असता ते बंद झाले होते. मात्र तेथील काही वेटरकडे विचारपूस केली असता प्रमोद नन्नवरे हा हॉटेलमधे येणारा नियमीत ग्राहक असल्याची माहिती पुढे आली. दरम्यान हॉटेलच्या सीसीटिव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. घटना उघडकीस आल्यानंतरच्या कालावधीत प्रमोद नन्नवरे हॉटेलमधे दारु पिण्यासाठी आला असल्याचे सीसीटिव्ही फुटेजमधे दिसून आले. महसुल मंडल अधिकारी अमोल पाटील हे देखील हॉटेलमधे मद्यपान करण्यासाठी आले होते. अमोल पाटील आणि प्रमोद नन्नवरे हे दोघे कारने सोबतच एरंडोलच्या दिशेने गेल्याचे तपासात उघड झाले. त्यामुळे पोलिसांनी सावध पवित्रा घेत महसुल अधिकारी अमोल पाटील यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र अमोल पाटील आणि प्रमोद नन्नवरे हे दोघे दारुच्या नशेत असल्यामुळे कुणीही फोन उचलत नव्हते. दारुच्या नशेत कधी अमोल पाटील तर कधी प्रमोद नन्नवरे असे दोघेजण आलटून पालटून कार चालवत होते. तरुणाच्या खूनाचा संशयीत आरोपी आपल्या सोबत असल्याचे मंडल अधिकारी अमोल पाटील यांना माहितीच नव्हते. दरम्यान मद्याच्या धुंदीत असलेले अमोल पाटील हे कार चालवत असतांना त्यांच्या हातून उस्मानाबाद जिल्ह्यातील नळदुर्ग नजीक एक अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वाराचा पाय फ्रॅक्चर झाला. या घटनेच्या वेळी मोठ्या प्रमाणात गर्दी जमली. या घटनेप्रकरणी चालकाच्या रुपातील मंडल अधिकारी अमोल पाटील यांच्याविरुद्ध नळदुर्ग पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. याच कालावधीत मंडल अधिकारी अमोल पाटील आणि खूनाच्या गुन्ह्यातील संशयीत आरोपी अमोल पाटील यांचे मोबाईल लोकेशन नळदुर्ग असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणले. त्यामुळे त्यांनी नळदुर्ग पोलिसांसोबत संपर्क साधून दोघांना आपल्या ताब्यात घेण्यास सांगितले. या कालावधीत अमोल पाटील यांच्याकडून झालेल्या अपघातामुळे दोघे नळदुर्ग पोलिसांच्या ताब्यात होते. नळदुर्ग पोलिसांकडून ताब्यातील दोघांचे फोटो मोबाईलवर मागवण्यात आले. ते फोटो अमोल पाटील आणि संशयीत प्रमोद नन्नवरे या दोघांचे होते. दोघेजण नळदुर्ग पोलिसांच्या ताब्यात असल्याचे समजल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस पथक नळदुर्ग येथे रवाना झाले. स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन वेगवेगळ्या पथकाने दोघांची स्वतंत्र चौकशी केली. आपल्यासोबत असलेला प्रमोद नन्नवरे हा खूनाच्या गुन्ह्यातील संशयीत आरोपी असल्याचे अमोल पाटील यांना माहीतीच नसल्याचे चौकशीत उघड झाले. शनीवार व रवीवारची सलग सुटी असल्यामुळे फिरायला जाण्यासाठी आपण प्रमोदला चालक म्हणून सोबत घेतल्याचे अमोल पाटील यांनी पोलिसांना सांगितले. दरम्यान दुस-या पथकाने प्रमोद नन्नवरे याची प्रसंगानुसार कधी नरमाईने तर कधी सक्तीने चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. दोघांना ताब्यात घेत जळगावला स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणले गेले. त्यानंतर दोघांना पाळधी दूरक्षेत्र येथे सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद कठोरे यांच्या ताब्यात देण्यात आले. मंडल अधिकारी अमोल पाटील यांनी खूनाच्या गुन्ह्यातील संशयीत आरोपी प्रमोद नन्नवरे याला केवळ चालकाच्या रुपात सोबत नेले होते. मात्र आपल्या सोबतचा प्रमोद नन्नवरे हा खूनाच्या गुन्ह्यातील संशयीत आरोपी असल्याचे अमोल पाटील यांना उशीरा समजले. अमोल पाटील यांच्याविरुद्ध नळदुर्ग येथील अपघात प्रकरणी तर प्रमोद नन्नवरे याच्याविरुद्ध धरणगाव पोलिस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास धरणगाव पोलिस स्टेशनचे पो.नि. उद्धव डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाळधी दुरक्षेत्रचे सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद कठोरे व त्यांचे सहकारी करत आहेत. या गुन्ह्याच्या तपासकामी पाळधी दुरक्षेत्रचे सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद कठोरे यांच्यासह सहायक फौजदार संजय महाजन, अरुण निकुंभ, हे.कॉ. गजानन महाजन, विजय चौधरी, पो.कॉ. योगेश सोनवणे, ज्ञानेश्वर बाविस्कर, रमेश सुर्यवंशी आदींनी सहभाग घेतला. या गुन्ह्याच्या समांतर तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किसनराव नजनपाटील यांच्या पथकातील हे.कॉ. विजयसिंग पाटील, सुधाकर अंभोरे, जितेंद्र पाटील, प्रमोद लाडवंजारी, किरण धनगर, चालक अशोक पाटील, चालक महेश सोमवंशी, अक्रम शेख, महेश महाजन, लक्ष्मण पाटील, विजय पाटील आदींनी सहभाग घेतला.

# मुसळधार पावसाने भिवंडीतील रस्त्यांची झाली चाळण, खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे सर्वच रस्त्यांवर वाहतूक कोंडी!



**भिवंडी/अभिजित हिरे**

जून पाठोपाठ जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने भिवंडी महानगर पालिका क्षेत्रातील सर्वच मुख्य रस्त्यांची चाळण झाली आहे. रस्त्यां वरील खड्ड्यां मुळे वाहनांचा वेग मंदावल्याने मुख्य रस्त्यांवरील प्रवाशांना वाहतूक कोंडीचा जाच सहन करावा लागत आहे. जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने भिवंडी शहरातील मुख्य धामणकर नाका ते वंजारपट्टी नाका रस्ता, कामतघर ताडाळी रोड, गौरीपाडा जुना ठाणा रोड या शहरातील मुख्य रस्त्यां वर मोठ मोठे खड्डे पडलेले असून, कधीकाळी रस्ते दुरुस्तीसाठी पालिकेने अनेक रस्त्यांवर फेवर ब्लॉकची मलमपट्टी केली होती. मुसळधार पावसात ही फेवर ब्लॉकची मलम पट्टी सुद्धा उघडून गेली आहे आणि त्यामुळेच शहरातील रस्त्यावर दीड ते दोन फुटापर्यंतचे खड्डे पडल्याने या रस्त्या वरून जाणाऱ्या वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

भिवंडी महानगरपालिका प्रत्येक वर्षी कोट्यवधी रुपये रस्ते बनविण्यासह रस्ते दुरुस्ती वर खर्च करीत असते. परंतु प्रत्येक वेळी रस्त्याचा दर्जा खालावलेला असतो त्यामुळे पहिला पाऊस झाला की शहरातील रस्त्यांची चाळण होत आली आहे. सध्या रामेश्वर मंदिर, कल्याण नाका, पायल सिनेमा, कामतघर, ताडाळी, वंजार पट्टी या परिसरात मोठे खड्डे पडले आहेत. त्या मुळे या मार्गावरील वाहन चालकांना वाहतूक कोंडीचा सामना तर करावा लागतोच पण या खड्ड्यांमुळे अनेक वाहन नादुरुस्त होऊन तो वेगळा आर्थिक भुर्दड विशेषतः रिक्षा चालकांना सोसावा लागत आहे.तर ज्या भागात कॉंक्रिट रस्ते तयार झाले आहेत त्या रस्त्या लगत साईड पट्टी व्यवस्थित बनवली नसल्याने कॉंक्रीट रस्त्या वर सुद्धा खड्डे पडायला सुरुवात झाली आहे. ठाणे शहरात रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांना संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याची तंबी तेथील आयुक्तांनी दिली त्यामुळे ठाण्यातील खड्डे भरण्याच्या कामाचा वेग वाढला आहे. परंतु भिवंडी शहरात अशी कोणतीही हालचाल खड्डे बुजवण्या संदर्भात पालिका प्रशासना कडून सुरू झालेली नसल्याने अजून काही काळ शहरातील नागरिकांना अशा खड्ड्या तूनच प्रवास करावा लागणार आहे.या बाबत भिवंडी महानगरपालिकेचे शहर अभियंता सुनील घुगे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो न झाल्याने या खड्डे दुरुस्तीवर पालिका नक्की कोणती उपाय योजना राबवणार याबाबत माहिती समजू शकली नाही.

## राम कनकट्टे यांचा निरोप समारंभ संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

येथील बुलडाणा अर्बन. को. ऑफ. क्रेडिट मल्टिस्टेट सोसायटी शाखा देवणी येथे कार्यरत असलेले लिपिक राम विश्वनाथ कनकट्टे यांची बदली मुक्रमाबद जिल्हा नांदेड येथे झाली असल्याने त्यांना देवणी बुलडाणा शाखेच्या वतीने त्यांना निरोप देण्यात आला. राम कन्नकट्टे गेली सात वर्षापासून लिपिक पदावर कार्यरत होते. परंतु शाखेतील सर्वच कामे करून देवणी तालुक्यातील बँक ग्राहकाला चांगली सेवा दिली आहे. नोकरी म्हटलं की बदली, बढती आणि सेवानिवृत्ती ह्या गोष्टी असतात. त्यातून सर्वच कर्मचारी यांना जावे लागते अशा उत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निरोप दिला जातो एक मनमिळाऊ कर्मचारी म्हणून राम कन्नकट्टे यांची ख्याती आहे त्याच्या भावी कार्यास भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून देवणी येथील स्थानिक संचालक सचिन मंगनाळे, प्रदीप अंगडे, संतोष लुल्ले, साईनाथ मोदी, देवणी शाखेचे शाखा व्यवस्थापक अंकुश राहाटे, सहाय्यक शाखा व्यवस्थापक संतोष केंद्रे, श्रीकांत बिरादार, लक्षीमन पवळे, तुळशीदास वागलगावे, सह गिरीधर गायकवाड, मनोहर बिरादार संगम, गुंडपा जीवने इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## ठाणे भिवंडी बायपास रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याचे कपिल पाटील यांचे निर्देश



भिवंडी : मुंबई नाशिक महामार्गावरील ठाणे भिवंडी बायपास रस्ता वाहतूक कोंडीत गुदमरला असल्याने त्या बाबत अनेकांची ओरड होत असताना विधानसभा पावसाळी अधिवेशनात या रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा मुद्दा चर्चिला गेला. त्यानंतर केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिल्ली येथील अधिवेशनातून परतताच ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात या रस्त्यावरील वाहतूक कोंडीच्या समस्येवर बैठक घेऊन आठ दिवसात या समस्येच्या सोडवणुकीसाठी उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. या बैठकीस जिल्हाधिकारी अशोक शिंनगारे, पोलिस अधीक्षक देशमाने, वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त डॉ विनय कुमार राठोड,उपविभागीय अधिकारी अमित सानप, भिवंडी पालिका आयुक्त अजय वैद्य व इतर अधिकारी उपस्थित होते. माजिवडा ते वडपे दरम्यान वाहतूककोंडीतून नागरिकांना दिलासा देण्यासाठी आठ दिवसात संपूर्ण रस्त्यावरील खड्डे भरावेत. त्याचबरोबर सकाळी सात ते रात्री अकरा पर्यत जड-अवजड वाहनांना बंदी घालावी,असे निर्देश केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिले आहेत.या मार्गावरील खड्डे आठ दिवसात भरण्या बरोबरच जड-अवजड वाहनांना बंदी घालावी,खर्डी व नवी मुंबईत वाहनांसाठी होल्डिंग पॉईंट तयार करावेत, अंजुर दिवे येथे दोन ठिकाणी व पिंपळास फाटा, ओवळी खिंड येथे हाईट बॅरियर लावावेत असे निर्देश या बैठकीत देण्यात आले आहेत.

## कोल्हापूर परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावामध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस संघाची उल्लेखनीय कामगिरी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



कोल्हापूर परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२३ हा दिनांक १९ जुलै २०२३ ते २१ जुलै २०२३ या कालावधीमध्ये पोलीस मुख्यालय पुणे ग्रामीण येथे पार पडला असून सोलापूर ग्रामीण संघाने ३ सुवर्ण, ३ रौप्य व ६ कांष्य पदके मिळवून कोल्हापूर परिक्षेत्रामध्ये सोलापूर ग्रामीण संघाने घवघवीत यश मिळविले आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस संघाचे नेतृत्व पोलीस निरीक्षक तय्युब मुजावर यांनी केले असून सपोनि दिलीप ढेरे बार्शी शहर यांनी 'फॉरेन्सीक सायन्स', श्वान टेरी व हस्तक पोहेकॉ सिध्दलिंग स्वामी श्वान पथक यांनी 'एक्सप्लोसिव्ह सर्च' व मपोकॉ क्रांती पवार पोलीस मुख्यालय यांनी पोलीस ऑब्जर्वेषन' या स्पर्धा प्रकारांमध्ये ३ सुवर्ण, पोहेकॉ जयवंत सादुल अंगुली मुद्रा विभाग यांनी पोलीस फोटोग्राफी', श्वान डॉली व हस्तक पोहेकॉ चिंतामनी जंगले श्वान पथक यांनी 'ट्राकर' व श्वान बॉन्ड व हस्तक पोकॉ तौसिफ शेख श्वान पथक यांनी 'नार्कोटीक्स' या स्पर्धा प्रकारांमध्ये ३ रौप्य, पोसई सुरज निंबाळकर सोलापूर तालुका यांनी फॉरेन्सीक सायन्स व ऑफिसर फोटोग्राफी', पोहेकॉ इकबाल षेख सीसीटीएनएस विभाग यांनी 'व्हीबी.नेट कॉम्प्युटर', पोकॉ प्रसाद मांढरे वळसंग यांनी व्हीबी.नेट व 'एमएस ऑफीस कॉम्प्युटर' व पोकॉ योगेष नरले सायबर यांनी 'एमएस ऑफीस कॉम्प्युटर' या स्पर्धा प्रकारांमध्ये ६ कास्य पदके मिळवून सोलापूर ग्रामीण पोलीस दलाची मान कोल्हापूर परिक्षेत्रामध्ये उंचावीली आहे. तसेच सपोफौ भातुंगडे, पोना चौगुले, मेटकरी, तांबोळी, पोकॉ खवतोडे, टोणपे व कांबळे यांनी सदर स्पर्धामध्ये सहभाग नोंदविला होता. न्या. श्याम चंडक, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश पुणे यांचे शुभ हस्ते, सुनिल फुलारी विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे प्रमुख उपस्थितीत सदरचे कार्यक्रम पोलीस मुख्यालय पुणे ग्रामीण व पोलीस संशोधन केंद्र , पुणे येथील सभागृह येथे दिनांक २१ जुलै रोजी बक्षीस वितरण व सांगता समारोह पार पडला. सदर कामगिरीबद्दल सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधिक्षक हिंमत जाधव, पोलीस उपअधीक्षक विजया कुर्री, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, आनंद काजुळकर राखीव पोलीस निरीक्षक, पोसई भारत मस्के श्वान पथक यांनी २८ जुलै रोजी सर्व पदक विजेते पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे बक्षिस देवून सत्कार करण्यात आला. तसेच सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील वरिष्ठ पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असून पदक विजेत्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## अतिवृष्टीमुळे संपर्क तुटलेल्या गावांमधे तात्काळ बोटींची सुविधा जिल्हाधिकार गोर्विंद बोडके यांनी पूर परिस्थितीची केली प्रत्यक्ष पाहणी

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे काही गावातील संपर्क यंत्रणा विस्कळीत झाली होती. काही ठिकाणी पूल देखील वाहून गेले होते. अशा गावांतील स्थानिकांना सुरक्षित स्थळी पोहचविण्यासाठी तात्काळ बोट उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी विक्रमगड, वाडा, मोखाडा या तालुक्यात प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली आणि आपत्कालीन परिस्थिती नियंत्रणात येईपर्यत स्थानिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या. पालघर जिल्ह्याला भारतीय हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जाहिर केला आहे. जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी आपत्कालीन परिस्थितीची माहिती घेण्यासाठी प्रत्यक्ष नद्या व धरणांना भेट दिली. प्रथमत: धामणी धरणाच्या विसर्गाबाबतची त्यांनी माहिती घेतली व धरणाच्या खालील भागातील गावांना सर्तक राहण्याचा सूचना त्यांनी केल्या. मोखाडा तालुक्यातील किर्लोद येथील नदीला भेट दिली. या ठिकाणी बोट उपलब्ध करून देण्यात आली होती. या बोटीची त्यांनी पाहणी केली व पाण्याचा प्रवाह वाढलेला असेल अशा परिस्थितीतही बोट सुरक्षित चालविता यावी यासाठी बोट चालविण्याचे विशेष प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षित व्यक्तीला बोट चालवायला लावली. जिल्हाधिकारी बोडके आणि वाडा, प्रांताधिकारी, भवानजी आगे पाटील यांनी स्वत: यातुन प्रवास केला. छऊठऋ यांनी दिलेल्या प्रशिक्षणाची गुणवत्ता तपासली. ही बोट या गावाला देण्यात आली आहे. या भेटीदरम्यान तहसिलदार मोखाडा, मयुर खेंगले, तहसिलदार विक्रमगड चारुशिला पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विवेकानंद कदम, NDRF ची टिम सदर ठिकाणी उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांनी वाडा, मोखाडा सह विक्रमगड तालुक्यातील नद्यांच्या पातळीची पाहणी केली व या नदीकाठी बसलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा तहसिलदार यांच्या मार्फत दिला. सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ठिकाणी राहण्याबाबत आणि आवश्यक ती मदत करण्याच्याही श्री. बोडके यांना यावेळी सूचना दिल्या.

## रेनिसन्स सीबीएसई स्कूलमध्ये करिअर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी**

इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी रेनिसन्स इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलमध्ये करिअर मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ.लड्डास् मेडिकल क्लासेसचे संचालक डॉ.विनोद लड्डा यांच्यासह सहसंचालिका डॉ.सौ.अर्चना लड्डा,अभिषेक लड्डा यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना अभिषेक लड्डा यांनी सध्याच्या परिस्थितीत आपण कशाप्रकारे आपल्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो?त्यासाठी कशी तयारी करावी ? नीट परीक्षा आणि त्याची तयारी कशी करावी ? याबाबत माहिती दिली. त्यासोबतच योग,ध्यान, आहार आणि वातावरण कसे महत्वाचे असते याविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. विनोद लड्डा यांनी करियरच्या संधी कशा असतात,त्यासाठी पालक म्हणून आपण काय करावे ? यश म्हणजे काय ?अभ्यासाचे नियोजन कसे करावे? आपले भविष्य कसे घडवावे? याची माहिती दिली. केवळ पुस्तक आणि शिक्षक याव्यतिरिक्त माहिती तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमातून आपण शिक्षण कसे घ्यावे? याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. अर्चना लड्डा यांनीही सर्व माता-पालकांना आपल्या मुलाच्या आयुष्यात आणि करिअर मध्ये एका आईचे किती आणि कसे महत्व असते याबाबत विचार मांडले. मुलांना चांगल्या सवयी कशा लावाव्यात, छोट्या गोष्टीतून मुलांचे करिअर कसे घडते? आदी विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**सार्व.बांधकाम विभाग, मुख्यालय, विरार (पु.)**

**जाहिर ई-निविदा सूचना**

१. विरार (पुर्व) प्रभाग क्र. २४ मध्ये फुलपाडा येथे प्रेक्षक गॅलरी असलेली इमारतीमध्ये येथे अग्निशमन केंद्र कर्मचाऱ्यांकरीता खोलीचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे.

वरील कामांचे कोरे निविदा फॉर्म http://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. ३१/०७/२०२३ पासून उपलब्ध होणार आहे. ई-टेंडरींग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार (मुख्यालय) येथे संपर्क साधावा.

जा.क्र.: वविशम/बांध/प्रसी/१४२०/२०२३

दिनांक : २८/०७/२०२३

Please visit our offcial web-site
http://mahatenders.gov.in

सही/-
(राजेंद्र लाड)
कार्यकारी तथा प्र.शहर अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका



**देवणी शहरातील स्मार्ट चिवर्स कोचिंग क्लासेसच्या वतीने डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी क्लासेसचे संचालक प्रा.सरफराज मंगरुळे, चव्हाण राहूल, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, फिजा मंगरुळे, क्लासेसचे १ली ते १०वी पर्यतचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी प्रा सरफराज सरांनी विद्यार्थाना डॉ ए पी जे अब्दूल कलाम यांच्या जिवनाविषयी सखोल मार्गदर्शन केले. सुमित सुर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले . भागवत गायकवाड याने आभार मानले.**

## थोडक्यात वृत्तांत



### नगतिर्थवडी येथे पीएम किसान सम्मान योजनेचा १४ हफ्ता लाभ वितरण कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण

देवणी : मौजे नागतिर्थवाडी ता.देवणी जि. लातूर येथे ग्राम पंचायत कार्यालयाच्या वतीने प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजने अंतर्गत १४ हफ्त्याचे लाभ वितरण संमेलन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सीकर राजस्थान येथे होत असलेल्या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण गावातील शेतकऱ्यांना दाखवण्यात आले. यावेळी गावचे सरपंच राज गुणाले, कृषी सहाय्यक सुर्यवंशी जी.बी. व तसेच गावातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नवीन साकवांसाठी १३०० कोटींचा आराखडा

मुंबई : राज्यातील डोंगरी तालुके, कोकण आणि आदिवासी भागातील सर्व रस्ते बारमाही वाहतुकीसाठी जोडण्यासाठी नवीन साकव व्हावेत अशी अनेक ठिकाणांवरून मागणी आहे. यासाठी सुमारे १३०० कोटींचा आराखडा तयार करण्यात येत आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधानसभेत दिली. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील शिंदे ते आरव येथील लोखंडी पूल दुरुस्ती दरम्यान झालेल्या अपघाताबाबत विधानसभा सदस्य रईस शेख यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री श्री.चव्हाण म्हणाले की, महाबळेश्वर तालुक्यातील शिंदी ते आरव दरम्यानच्या तुटलेल्या पुलाच्या कामाची निविदा मंजूर करण्यात आली असून ते काम पुढील पावसाळ्यापूर्वी पूर्ण केलं जाईल. या आराखड्यातून ओढे, नाले यावरील छोटे पूल पक्क्या स्वरूपात बांधले जातील आणि अशा साकवांसाठी एक कोटीपर्यंतचा निधी उपलब्ध करून दिला जाईल. यावेळी सदस्य सर्वश्री रवी पाटील, योगेश कदम, संग्राम थोपटे, प्रकाश आबिटकर यांनी सहभाग घेतला.

### पालघर जिल्ह्यात महसूल सप्ताहाचे आयोजन

पालघर : राज्यभर दि. १ ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून साजरा करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. त्यानिमित्ताने जिल्ह्यात दि.१ ते ७ ऑगस्ट २०२३ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी दिली आहे. या सप्ताहामध्ये नागरिकांनीही आपला जास्तीत जास्त सहभाग नोंदवून देण्यात येणाऱ्या विविध सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. महसूल व वन विभागाच्या दि. २५ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार १ ते ७ ऑगस्ट हा महसूल सप्ताह साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सप्ताहात दि.१ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करणे,व महसूल शुभारंभ, दि. २ ऑगस्ट रोजी युवा संवाद करणे, दि.३ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा दि.४ ऑगस्ट रोजी जनसंवाद दि.५ ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी दि.६ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील जिल्हयात कार्यरत असलेल्या, सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी संवाद आणि या महसूल सप्ताह उपक्रमाच्या शेवटच्या दिवशी दि.७ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताह सांगता समारंभ. या महसूल सप्ताहाच्या सर्व कार्यक्रमां सहभागी होण्याचे व जास्ती जास्त नागरिकांनी योंजनाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले.

### टॅक्सी भाडे नाकारल्यास करा व्हॉट्सपवर तक्रार

मुंबई : शहर व उपनगरातील ऑटोरिक्षा अथवा टॅक्सी चालकाने भाडे नाकारले, जादा भाडे आकारले, गैरवर्तन केल्यास ९१५२२४०३०३ या क्रमांकावर व्हॉट्सपद्वारे तक्रार करण्याचे आवाहन मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाचे सचिव तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय अहिरे यांनी केले आहे. मुंबई व मुंबई उपनगरातील बहुतांशी प्रवाशांची वाहतूक ही काळी पिवळी टॅक्सी व ऑटोरिक्षा मधून होत असते. वाहतुकीदरम्यान प्रवाशांशी गैरवर्तन, भाडे नाकारणे, विहित दरापेक्षा जादा दराने भाडे आकारणाऱ्या रिक्षा, टॅक्सी चालकांविरोधात तक्रारी प्राप्त होत असतात. प्रवाशांचा वेळ वाचावा आणि तक्रार करण्यास अडचणी येऊ नयेत यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वरील व्हॉट्सप क्रामकावर मेसेज, फोटो किंवा ई-मेलद्वारे तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. कॉल स्वीकारले जाणार नाहीत. तक्रारीमध्ये वाहन क्रमांक, ठिकाण, वेळ, थोडक्यात तक्रारीचे स्वरूप, तक्रारदाराचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी नमूद करण्यात यावा. संबंधित दोषी चालकांवर मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत तरतुदींनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचेही प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी सांगितले आहे.

### उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना मिळणार पुरस्कार

लातूर : १९ सप्टेंबर २०२३ पासून सुरु होत असलेल्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहे. या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे. राज्यात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना पाच लाख रुपये, अडीच लाख रुपये आणि एक लाख रुपये असे परितोषिक देण्यात येणार आहे. तसेच राज्य समितीकडे ३६ जिल्ह्यातील १ याप्रमाणे ३६ शिफारसीत गणेशोत्सव मंडळापैकी ३ विजेते गणेशोत्सव मंडळ वगळून उर्वरित ३३ गणेशोत्सव मंडळांचाही राज्य शासनाकडून २५ हजार रुपये पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्यातील गणेशोत्सव मंडळानी मराठवाडा मुक्तिसंग्राम, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, पर्यावरण, वृक्ष लागवड अशा देखाव्यावर भर दिला तर लोकांचे प्रबोधन होईल. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांनी असे देखावे तयार करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. या स्पर्धेसाठी प्रत्येक जिल्ह्यातील विजेत्या गणेशोत्सव मंडळाची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गणेश महाडिक यांनी कळविले आहे.



# भिवंडी महापालिका जुन्या गळक्या धोकादायक इमारतीमध्ये शेकडो कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका प्रशासकीय कारभार नवीन मुख्यालय इमारतीमध्ये २०१२ मध्ये स्थलांतरीत झाला. त्यानंतर जुनी महानगरपालिका मुख्यालय इमारत दुर्लक्षित झाली.या इमारती मध्ये प्रभाग समिती क्रमांक एक व प्रभाग समिती क्रमांक दोन चे प्रशासकीय कार्यालय व विविध विभाग सुरू करण्यात आले आहे. परंतु ही इमारत धोकादायक झाल्याने पावसाळ्यात गळत आहे आणि अशा अवस्थेत या इमारतीमध्ये दोनशे हून अधिक कर्मचारी जीव धोक्यात घालून काम करीत आहेत. विशेष म्हणजे तीस वर्ष जुनी इमारत ही धोकादायक म्हणून ओळखली जाते.त्यानुसार भिवंडी पालिका मुख्यालयाची जुनी इमारत ही सुध्दा धोकादायक झाली आहे. विशेष म्हणजे मागील दहा वर्षात या इमारती कडे पालिका प्रशासनाने ढुंकून ही पाहिले नाही की कधी जुजबी दुरुस्ती केली. तळ अधिक तीन मजली असलेल्या या



इमारतीच्या छता वर लावलेले सिमेंट पत्रे गळके झाल्याने तेथून गळणारे पाणी लिफ्ट बसवलेल्या डकमध्ये व इतर सर्वत्र गळत असते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना कार्यालयात बसून काम करण्यासाठी मोठी अडचण येत आहे. ज्यामुळे या कार्यालयांमधील अनेक दस्तावेज भिजून खराब झाले आहेत.या इमारती मध्ये प्रभाग कार्यालयां सोबतच जन्ममृत्यु विभाग, एलबीटी विभाग, परवाना विभाग, भविष्य निवार्ह निधि विभाग, संगणक विभाग कार्यरत आहे. त्यामुळे या इमारती मध्ये कर्मचाऱ्यांसह अनेक नागरिकांचा वावर असतो. त्यामुळे कधी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पालिका प्रशासनाने मागील महिन्यात जुन्या प्रशासकीय इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट शहरातील सुप्रसिद्ध इंजिनियर जावेद आजमी यांनी केले. तपासणीमध्ये इमारत धोकादायक असल्याचे अहवालात स्पष्ट नमूद केले आहे. त्यानुसार इमारत सी २ अ श्रेणीत मोडत आहे.तर इमारती चे आठ खांब तातडीने दुरुस्त करण्याची गरज असून ही इमारत अंशत : रिकामी करून दुरुस्त करणे गरजेचे आहे. नागरिकांच्या इमारती धोकादायक असल्यास त्या रिकाम्या करण्यास साठी पालिका प्रशासन तातडीने पावले उचलत पणे आपल्याच मालकीची असलेली प्रशासकीय इमारत धोकादायक झाली असताना कोणाच्या कारवाईची वाट पालिका प्रशासन बघत आहे. पालिका प्रशासन या साठी काय उपाययोजना करीत आहे हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# जनसंवाद अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शना खाली जनसंवाद अभियान अंतर्गत वाडा तालुक्यातील परळी आश्रमशाळा येथील विद्यार्थ्यांना पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी संवाद साधला. जनसंवद अभियानातून सामान्य नागरिकांना भेटून त्यांच्यासाठी असलेल्या कायद्यांबाबत जागृत करण्याच्या उद्देशाने गाव भेटीचे आयोजन करण्यात येते त्याच अनुषंगाने विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याने परळी आश्रम शाळेच्या विषयार्थ्यांची भेट घेऊन त्यांना शिक्षणाचे महत्त्व व स्पर्धा परीक्षा बाबत माहिती, मोबाईलचे दूरउपयोग, सायबर क्राईम, गुड टच बॅड टच, डायल ११२, महिला अत्याचार बालविवाहाचे दुष्परिणाम, महिलांवर होणारे परिणाम बाबत माहिती देऊन त्यांच्याशी संवाद साधला. तर शिक्षण घेत असताना आपले आई-वडील व गुरुवर्या यांचा आदर करणे बाबत माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक व दिडशेच्या वर विध्यार्थी उपस्थित होते.

# युवा महोत्सवाच्या झोन ५मध्ये अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचे वर्चस्व

**वसई/प्रतिनिधी**

येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाने झोन क्र. ५ मध्ये 'ओव्हरऑल झोनल चँपियनशिप' पटकावली आहे. या घवघवीत यशाबद्दल विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष मा. विकास वर्तक तसेच सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे तसेच सर्व प्राध्यापक सहकारी, प्रबंधक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सखाराम डाखोरे व सर्व सदस्य तसेच विद्यार्थी प्रतिनिधी कामेश पाटील, सहाय्यक विद्यार्थी प्रतिनिधी यश सिंग, विद्यार्थीनी प्रतिनिधी मिताली अल्मेडा, सहाय्यक विद्यार्थीनी प्रतिनिधी आशिया खान तसेच सर्व विद्यार्थी सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित ५५ व्या युवा महोत्सावाचा २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच शुक्रवार दिनांक २८ जुलै २०२३ रोजी मुंबई, फोर्ट येथील कावासजी जहांगीर सभागृहात पार




पडला. यावेळी युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या ११ झोन्समधील महाविद्यालयांनी प्राप्त केलेल्या पारितोषिकांचे वितरण नवी दिल्ली येथील भारतीय विद्यापीठ संघटनेच्या सेक्रेटरी जनरल डॉ. पंकज मित्तल, मुंबई विद्यापीठाचे प्रा. कुलगुरू डॉ. अजय भामरे, युवा महोत्सव समन्वयक डॉ. निलेश सावे तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते पार पडले. अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाने झोन क्र. ५ मध्ये नृत्य, नाट्य, संगीत, ललित कला आणि साहित्य अशा विभागांमधून तब्बल १५ पारितोषिके प्राप्त करून विद्यावर्धिनी शिक्षणसंस्थेचा नावलौकिक वाढविला व मुंबई विद्यापीठामध्ये आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली. त्याबद्दल सर्व स्तरांतून सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी कलावंतांचे कौतुक होत आहे.

# मणिपुर घटनेतील गुन्हेगारांना फाशीच्या शिक्षेची मागणी

## आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेचे तहसिलदारांना निवेदन



**वाडा/प्रतिनिधी**

मणिपुर मधील मैतई व कुकी या दोन समुदयात उसळलेल्या हिंसाचारातुन २ कुकी आदिवासी महिलांची नग्न अवस्थेत धिंड काढुन त्यांच्यावर अमानुषपणे सामुहीक बलात्कार करुन त्यांच्या नातेवाईकांचा खुन करण्यात आला आहे, हि घटना ४ मे २०२३ रोजी घडली जवळ जवळ अडीच महिन्याचा कालावधी लोटला परंतु कुठेही ही घटना उघड झाली नव्हती ही खेदाची बाब आहे. अशा हजारो घटना मणिपुर मध्ये घडत असुन संपुर्ण मणिपुर पेटला आहे तिथे राहणाऱ्या आदिवासी समुदायाचे अस्तीत्व धोक्यात आले आहे, हे कृत्य करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा देण्यात यावी जेणेकरुन पुन्हा कुठल्याही जाती-धर्माच्या महिलांवर असा प्रसंग ओढावणार नाही, या घटनेचा वाड्यात जाहिर निषेध व्यक्त करण्यात आला तसेच तहसिलदार व पोलीस स्टेशन वाडा यांना मणिपुर घटनेमधील आदिवासी महिलांवर अमानविय अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच या कृत्यास प्रोत्साहन देणाऱ्या जमावावर कठोर शिक्षा व्हावी असे निवेदन देण्यात आले आहे. यावेळी निवेदन देताना आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष अनंता वनगा, पालघर जिल्हा अध्यक्ष अरुण खुलात, जिल्हा संघटक नितिन दळवी, वाडा तालुका अध्यक्ष दयानंद हारळ,वाडा शहर अध्यक्ष सुनिल तुंबडा, सचिव नरेश ठाणगे, उपाध्यक्ष प्रकाश हारळ उपस्थित होते.

# महिलांवरील अत्याचाराचा श्रमजीवी संघटनेने केला निषेध




**वाडा/प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील आदिवासी महिला व मणिपूर राज्यातील दोन महिलांवार अमानुष अत्याचार झाल्याचा प्रकार समोर आला असून या प्रकाराचा निषेध वाडा येथे मुक मोर्चा काढून करण्यात आला.सोमवार दि. २४ जुलै रोजी श्रामजीवी संघटनेच्या वतीने खंडेश्वरी नाका येथून तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून मोर्चा काढण्यात आला. याप्रसंगी श्रामजीवी संघटनेच्या महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हा मोर्चा तहसील कार्यालया वर जाऊन धडकल्या नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावे असलेले निवेदन तहसीलदार यांना देऊन महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना योग्य शासन होण्याची मागणी केली. श्रामजीवी संघटनेचे रामभाऊ वारणा,स्नेहा दुबे-पंडित, बाळाराम भोईर, विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखली हा निषेध मोर्चा काडगाण्यात आला. यावेळी तालुका अध्यक्ष भरत जाधव, राजू मोहंडकर, सुरज दळवी मोतीराम वारे, प्रमिला तारसे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पावसामुळे जळकोट तालुक्यात झालेल्या नुकसानीची लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केली पाहणी

**लातूर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जळकोट तालुक्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या सततच्या पावसामुळे काही भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पिकांचे, घरांचे नुसकान झाले असून जनावरे मृत्युमुखी पडली आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून नुकसानीचे पंचनामे, मदत वाटप आदी बाबींचा आढावा घेतला. तसेच नागरिकांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार सुरेखा स्वामी, गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार यांच्यासह विविध यंत्रणांचे विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.जळकोट तालुक्यातील काही भागात पुराचे पाणी घरात घुसून, तसेच घरांच्या पडझडीने नुकसान झाले आहे. तसेच या परिसरातील जनावरांचा मृत्यू, जमीन खरडून जाण्याच्या घटना घडल्या आहेत. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी



रावणकोळा, मरसांगवी, आतनुर आणि शिवाजीनगर तांडा येथे भेट देवून नागरिकांशी संवाद साधला. घरात पाणी घुसल्याने नुकसान झालेल्या रावणकोळा येथील सागरबाई रावसाहेब पोले, पारुबाई भाऊराव पोले आणि राधाबाई बळीराम डोंगरगावे यांच्या घरी भेटी दिल्या. मरसांगावी येथील मौला हुसेन जमादार, तसेच आतनूर येथील प्रल्हाद नारायण सोमवसे यांच्या शेतात झालेल्या नुकसानी बाबत शेतकरी यांच्याशी संवाद साधला. तसेच जनावरांचा मृत्यू, जमीन खरडून जाणे आदी नुकसानीचीही जिल्हाधिकारी यांनी यावेळी माहिती घेतली, तसेच या नुकसानीच्या पंचनाम्याचा आढावा घेतला. नुकसानग्रस्तांना शासन नियमाप्रमाणे तातडीने द्यावयाच्या मदतीचे विनाविलंब वितरण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. ज्याठिकाणी पुल वाहून गेले आहेत, त्याठिकाणी संबंधित यंत्रणेला तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच जे तलाव भरलेले आहेत त्याठिकाणी योग्य ती दक्षता घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या सर्व नागरिकांना शासनाची मदत भेटेल, मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही, याची प्रशासन दक्षता घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

# देवणी शहरातील मस्जिदच्या नावाने नोंद असलेली जागा रद्द केल्याने नगरपंचायतीसमोर दोन तास ठिय्या आंदोलन!

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरातील गडीवरील जमिनित मस्जिद च्या नावाने नोंद असलेली जागा रद्द केल्याने नगरपंचायत समोर दोन तास ठिय्या आंदोलन करून नगरपंचायतला निवेदन देण्यात आले. या निवेदनात असे म्हंटले आहे की देवणी शहरातील जमीनीत सर्वे न ५३९९ मध्ये ६२ बाय ४० ची मस्जिद च्या नावे नमुना ८अ वर नोंद होती व तसेच वक्फ ट्रंबनल कोर्ट औरंगाबादींीं पे ३११/२०२२ दिनांक ०१/०४/२२ रोजी स्टे असताना सुध्दा देवणी नगर पंचायतने मस्जिद च्या नावे असलेला नमुना न ८ अ खारीज केल्याने, मुस्लिम समाजाच्या वतीने शुक्रवारी नगर पंचायतिच्या समोर निवेदन देण्यासाठी शेकडो संख्येने नागरिक जाऊन नगराध्यक्षा किर्तीताई घोरपडे याना निवेदन देण्यात आले. मुख्याधिकारी नसल्याने परत सोमवारी निवेदन कृत्यांना चर्चेसाठी बोलावण्यात आले आहे. देवणी शहरात मुस्लिम समाजाची लोकसंख्या



एक नंबर वर असून मुस्लिम समाजाचा काँग्रस पक्षाने फक्त निवडणुकी पुरता वापर करून घेत असल्याचा आरोप मुस्लिम समाजातून केला जात आहे. वरील सर्व प्रकार पाहता आसाच प्रकार मुस्लिम समाजाच्या समशान भूमी बाबत घडला असल्याचे काँग्रेस च्याच काळात ग्राम पंचायत आणि नगर पंचायत सत्तेवर असताना असे प्रकार वारवर घडत असल्याचे मुस्लिम समाजातील नागरिकांचे म्हणणे आहे. यावेळी निवेदनावर वक्फ कमिटीचे आद्यक्ष जीलानी बुधलेघर, एमआयएमचे अध्यक्ष फय्याज शेख, मौलाना हाफिज नयुम, जावेद तांबोळी, आलिम टेलर, सलीम उंटवाले, करीम शेख, मैनोदीन शेख, सादक खुरेशी, अहमद सय्यद, इसूब बुधलेघर, मन्सूर पठाण, मुजीब शेख, सुलतान मल्लेवाले ,मौजूद शेख नवाज शेख काशीम बुधलेघर, अजहर कुरेशी, इस्माईल तांबोळी, अन्वर तांबोळी, अखिल तांबोळी, नवाब शेख, फिरोज शेख यांच्या सह अनेक मुस्लिम बांधवांच्या स्वाक्षऱ्या व शेकडोच्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# जेष्ठ लोक कलावंतांच्या विविध प्रश्नासाठी लातूर काँगेस कमिटीकडून धरणे आंदोलन!

**लातूर/प्रतिनिधी**

आपल्या कलेचे विविध कला प्रकारात सादरीकरण करून श्रोत्यांची मने जिंकलेल्या जेष्ठ कलावंताच्या विविध प्रलंबित प्रश्नावर लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी च्या वतीने सोमवार दिनांक २४ जुलै रोजी लातूर शहरातील महात्मा गांधी चौक भागात भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. जेष्ठ कलावंतांना पद्मश्री, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करावे.

लोककवि वामनदादा कर्डक यांच्या नावाने लोककलावंत आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे,सरकारी घरकुल योजनेत कलावंतांसाठी १०टक्के राखीव कोटा ठेवावा, राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी साहित्य सम्मेलन आयोजित करावे. शासकीय पुरस्कार प्राप्त कलावंतांना साध्या एसटी बस प्रमाणे शिवशाही बस मधून देखील मोफत प्रवास सुविधा द्यावी. लातूर येथील वयोवृद्ध कलावंत मानधन समिती लवकरात लवकर




गठीत करावी. यासह अन्य मागण्यांसाठी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी तसेच नाट्य सांस्कृतिक सेल लातूरचे अध्यक्ष नागसेन कामेगावकर, विपुल हाके, लोककलावंत सांस्कृतिक सेल लातूर जिल्हाध्यक्ष राजकुमार सकपाळ व सहकारी यांच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी लातूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष सुभाष घोडके, पृथ्वीराज शिरसाठ, स्मिता खानापुरे, सपना किसवे, रमेश सूर्यवंशी, प्रा.एकनाथ पाटील, प्रवीण सूर्यवंशी, अॅड. देविदास बोरुळे पाटील, युनूस मोमीन, प्रा.प्रवीण कांबळे, यशपाल कांबळे, शिवाजी कांबळे, कुणाल वागज, अकबर माडजे, अभिषेक पतंगे, अभिजीत इगे, विष्णुदास धायगुडे, जालिंदर बर्डे, पवन सोलंकर, इस्रार पठाण, करीम तांबोळी, पवन गायकवाड, सुलेखा कारेपूरकर, शितल मोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.